
## भारत-इटलीमध्ये विशेष धोरणात्मक भागीदारी



**रोम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या पाच देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात इटलीची राजधानी रोमला पोहचले. यावेळी संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदींनी भारत आणि इटलीने आपल्या संबंधांना 'स्पेशल स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप' (विशेष धोरणात्मक भागीदारी)चा दर्जा दिल्याची घोषणा केली. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही उभय देशांदरम्यानचा व्यापार आणखी मजबूत करण्यावर भर दिला. सध्या दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १४ अब्ज युरो आहे, जो २०२९पर्यंत २२ अब्ज युरोवर नेण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हे लक्ष्य गाठण्यासाठी भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील प्रस्तावित 'मुक्त व्यापार कराराचा' (एफटीए) मोठा फायदा होईल, असा विश्वास मेलोनी यांनी व्यक्त केला. पंतप्रधान मोदींनीही या करारामुळे दोन्ही देशांतील व्यावसायिक समुदायाला मोठा फायदा होईल, असे सांगितले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३०२
www.ramprahar.com

◆ गुरुवार, २१ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


आपट्यातील वाड्या-वस्त्यांमध्ये विकासाचा झंझावात/३

माणगावच्या शिवा मोरेची भारतीय लष्करात निवड/५

'आरडीसीए'च्या स्पर्धेत फ्युचर स्टार संघ चॅम्पियन/८


विधान परिषद निवडणूक

# महायुती एकत्रितच लढणार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील तिन्ही मित्रपक्ष एकत्रित बसून जागावाटपाचा अंतिम निर्णय घेतील. आम्ही सध्या वेगवेगळ्या निकषांवर चर्चा करीत असून या निवडणुकीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रितपणे पूर्ण ताकदीने उतरतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.२०) दिली. मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विधान परिषद रणनीतीसह राज्यातील इंधन पुरवठा, मंत्रिमंडळ निर्णयांची अंमलबजावणी आणि औद्योगिक करारांवर सविस्तर भाष्य केले.



राज्यात काही भागांत सुरू असलेल्या पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्याच्या चर्चांवर मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले. ते म्हणाले, केंद्र सरकारने वारंवार स्पष्ट केले आहे की, देशात आणि राज्यात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा असून पुरवठा सुरळीत सुरू आहे, मात्र सोशल मीडिया किंवा अन्य माध्यमांतून विनाकारण घबराट (पॅनिक) निर्माण केली जात आहे. कोणत्याही पेट्रोल पंपाची किंवा भागाची एक निश्चित पुरवठा साखळी ठरलेली असते, परंतु जेव्हा अफवांमुळे लोक अचानक वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त इंधन भरू लागतात, तेव्हा त्या साखळीवर ताण येतो. याचा अर्थ साठा कमी आहे असा अजिबात होत नाही. जागतिक परिस्थिती कठीण असतानाही भारताने आपली पुरवठा साखळी मजबूत ठेवली असून नागरिकांनी आवश्यकतेनुसारच इंधनाचा वापर करावा आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले.

राज्य सरकारच्या कामाचा लेखाजोखा मांडताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, नुकतीच मंत्रालयात मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीची आढावा बैठक पार पडली. यामध्ये सर्वच विभागांनी सादरीकरण केले. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांपैकी तब्बल ९२ टक्के निर्णय पूर्णपणे कार्यान्वित झाले आहेत. उर्वरित आठ टक्के निर्णयांपैकी काही प्रस्ताव राज्यपाल किंवा राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, तर काही तांत्रिक बाबींवर काम सुरू आहे. एकूणच राज्याची प्रगती समाधानकारक आहे.

# पंतप्रधान मोदी जगात भारताची प्रतिष्ठा जपण्याचे काम करताहेत

## राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवारांकडून कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आमचा राजकीय विचार वेगवेगळा असला तरी देशहिताचा प्रश्न असेल तेव्हा राजकीय मतभेद आड येता कामा नये. पंतप्रधान मोदी जागतिक पातळीवर भारताची जी प्रतिष्ठा आहे, तिला जपण्याचेच काम करीत आहेत, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी कौतुक केले.



मुंबईमध्ये लक्ष्मणराव गुट्टे ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विविध नेत्यांचा सन्मान करण्यात आला. त्या वेळी खासदार शरद पवार बोलत होते. ते म्हणाले, देश आज एका वेगळ्या दिशेने चालला आहे. नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत. काही राजकीय विचारांसंबंधी आमची आणि त्यांची भूमिका ही वेगवेगळी असू शकते, पण आज जगामध्ये भारताची प्रतिष्ठा जपण्याचे काम पंतप्रधान मोदी करीत आहेत ही गोष्ट आपल्याला विसरून चालणार नाही. देशाची प्रतिष्ठा महत्त्वाची आहे, जिथे देशाची प्रतिष्ठा असते तिथे राजकीय मतभेद येऊ द्यायचे नसतात.

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, पी.व्ही. नरसिंहराव आणि मनमोहन सिंग यांच्यासारख्या नेत्यांनी देशाचे भविष्य आणि त्याची प्रतिष्ठा केंद्रस्थानी ठेवली. विद्यमान पंतप्रधान मोदीही तेच करीत आहेत, असे खासदार पवार यांनी सांगितले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांना 'जीवन गौरव'

## पत्रकार उत्कर्ष समितीकडून सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनसेवेच्या महान यज्ञामध्ये उल्लेखनीय योगदान देत भावी पिढीला प्रेरणा देणारे माजी खासदार, दानशूर व्यक्तिमत्त्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पत्रकार उत्कर्ष समिती, महाराष्ट्र यांच्यातर्फे जीवन गौरव सन्मानाने गौरविण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, वैद्यकीय, साहित्य क्षेत्रातील त्यांचे अनन्यसाधारण कार्य क्षितिजावर तळपणाऱ्या सूर्यासारखे तेजोमय आहे, अशा शब्दांत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी या वेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.

पत्रकार उत्कर्ष समितीच्या वतीने प्रदेशाध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे, रायगड उपाध्यक्ष अशोक घरत, सदस्य सुनील भोईर, उरण तालुकाध्यक्ष पूजा चव्हाण आदी पदाधिकाऱ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन शाल, पुष्पगुच्छ व मानपत्र देऊन यथोचित सन्मान केला. "जनसेवेच्या महान यज्ञामध्ये आपले योगदान उल्लेखनीय असून भावी पिढीला प्रेरणादायी आहे. आपले कार्य क्षितिजावर तळपणाऱ्या सूर्यासारखे तेजोमय आहे. पत्रकार उत्कर्ष समितीतर्फे या तेजपुंजास गौरविताना आम्हास आनंद होत आहे," असा आशय असलेले मानपत्र यावेळी प्रदान करण्यात आले.

पत्रकार उत्कर्ष समितीने केलेल्या या सन्मानाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. भूमिपुत्रांच्या हक्कासाठी व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या सत्कार सोहळ्याला समितीचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## कोकेन जप्त, तिघे गजाआड

**नवी मुंबई : बातमीदार**

अमली पदार्थांच्या बेकायदा व्यापाराविरोधात नवी मुंबई गुन्हे शाखेने वाशीतील जुहुगाव परिसरात केलेल्या धडक कारवाईत तब्बल एक कोटी २६ लाख २५ हजार रुपये किमतीचा कोकेनचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत तीन नायजेरियन नागरिकांना अटक करण्यात आली आहे.

वाशी सेक्टर ११मधील हरियाली निवास येथील एका फ्लॅटमध्ये झडती घेण्यात आली. तेथून २५२.५ ग्रॅम वजनाचा कोकेनचा साठा व १२ मोबाइल फोन जप्त करण्यात आले. या प्रकरणी तीन नायजेरियन नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

## पंतप्रधान मोदींमुळे आपले पुढील २० वर्षांचे भवितव्य सुरक्षित : मुख्यमंत्री

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कौतुक केल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया दिली. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याकडून आलेली ही प्रतिक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.



"शरद पवार यांनी जे सांगितले ते महत्त्वाचे आहे. ज्यावेळी काही लोक हे पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेशात का गेले, तिकडे काय होतंय अशी टीका करीत होते त्यावेळी वेगवेगळ्या देशांसोबत भारताने महत्त्वाचे करार केले आहेत. या करारांमुळे पुढील २० वर्षांचे आपले भवितव्य सुरक्षित झाले आहे. म्हणूनच शरद पवार यांनी सांगितले की, विनाकारण टीका करू नका. पंतप्रधान परदेशात जाऊन देशहिताचे काम करीत आहेत. त्यांच्यावर टीका करणे योग्य नाही," असे मुख्यमंत्री म्हणाले.

## 'शेतकरी कर्जमाफीला आचारसंहितेचा अडथळा नाही'

**मुंबई :** राज्य विधान परिषदेच्या निवडणूक आचारसंहितेचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर कोणताही परिणाम होणार नसून येत्या ३० जूनपूर्वी बळीराजासाठी कर्जमाफीची अधिकृत घोषणा केली जाईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी (दि.२०) दिली. कर्जमाफी हा सरकारचा पूर्वनियोजित धोरणात्मक निर्णय असून यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अत्यंत सकारात्मक आहेत, असेही कृषिमंत्र्यांनी सांगितले.

## निवडक

### भोंदू अशोक खरातला २६ मेपर्यंत ईडी कोठडी

**नाशिक :** भोंदूबाबा आणि मनी लॉण्डरिंग प्रकरणातील आरोपी अशोक खरात याच्याभोवती अंमलबजावणी संचालनालयाचा (ईडी) फास आता घट्ट आवळत चालला आहे. त्याला बुधवारी (दि.२०) पीएमएएल न्यायालयात हजर करण्यात आले होते. नेहमी शांत राहणारा खरात कोर्टात पहिल्यांदाच बोलला. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायाधीशांनी खरातला २६ मेपर्यंत ईडी कोठडी सुनावली. कोठडीदरम्यान ईडी खरातच्या ६० बँक खात्यांमधील पैशांचे गूढ आणि ७० मालमत्तांचे जाळे उघडकीस आणणार आहे.

### 'नीट' पेपरफुटीप्रकरणी शुभम खैरनारला सीबीआय कोठडी

**नवी दिल्ली :** 'नीट' पेपरफुटी प्रकरणात आरोपी शुभम खैरनारला न्यायालयाने पाच दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. सीबीआयने न्यायालयाकडे केलेली मागणी न्यायालयाने मान्य केली आणि पुढील तपासासाठी खैरनारला तपास यंत्रणेच्या ताब्यात देण्याचे आदेश दिले.

## मुंबईत अतिक्रमणविरोधी कारवाईदरम्यान दगडफेक

■ पोलिसांकडून लाठीचार्ज, धरपकड



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील वांद्रे रेल्वेस्थानकालगतच्या गरीबनगर परिसरात पश्चिम रेल्वेने सुरू केलेल्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या अतिक्रमणविरोधी मोहिमेदरम्यान बुधवारी (दि.२०) गोंधळ उडाला. कारवाईला विरोध करीत तब्बल ५० ते ६० जणांच्या जमावाने पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांवर अचानक दगडफेक आणि पाण्याच्या बादल्या, बाटल्या फेकल्या. या हल्ल्यात काही पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.

अतिक्रमणाविरोधी मोहिमेच्या बुधवारी दुसऱ्या दिवशी वांद्रे रेल्वेस्थानकालगतच्या बेकायदेशीर बांधकामावर बुलडोझर चालवण्यात आला. हे पाहताच स्थानिक रहिवासी, महिला आणि तरुण रस्त्यावर उतरले.

सुरुवातीला फक्त विरोध करणाऱ्या जमावाने अचानक आक्रमक पवित्रा घेतला. पोलिसांनी लोकांना समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र जमावाने पोलिसांच्या दिशेने दगड, पाण्याच्या बाटल्या आणि प्लास्टिकच्या बादल्या फेकण्यास सुरुवात केली.

स्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून मुंबई पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाने सौम्य लाठीचार्ज केला तसेच दगडफेक करणाऱ्यांना गल्लीत घुसून पकडून बाहेर आणले. सध्या संपूर्ण परिसराला लष्करी छावणीचे स्वरूप आले आहे.

# नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिटला आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट अन् शुभेच्छा






**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील यू बिझनेस मीटच्या वतीने नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट २०२६चे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि थायलंड यांच्यादरम्यान व्यापार उद्योजकता वृद्धिंगत व्हावी यासाठी बेलापूरच्या दि पार्क हॉटेलमध्ये झालेल्या बिझनेस समिटला भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयोजकांना तसेच थायलंड येथून आलेले पिएटा सदस्य तथा माजी राजदूत थाराडोल थाँगग्रंग आणि पिटा सदस्य नरेन पियासच्चादेश यांनाही शुभेच्छा दिल्या.

या समिटमध्ये विविध व्यवसायिकांच्या पॅनल डिस्कशनसाठी मॉडरेटर म्हणून काम पाहणारे प्रसिद्ध पत्रकार महेश म्हात्रे आणि टाइम्स ऑफ इंडियाचे असिस्टंट एडिटर चित्तरंजन टेंभेकर यांचेदेखील आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन केले. या बिझनेस मिटचे फाउंडर वैभव सोनटक्के आणि को-फाउंडर रवींद्र प्रताप गुप्ता, पत्रकार मंदार दोंदे, पत्रकार विवेक पाटील, समृद्धी वाणी यांच्या संकल्पनेतून समिटचे आयोजन करण्यात आले होते.

# पनवेल मनपाचा नालेसफाई आणि परिसर स्वच्छतेवर भर

## महापौरांकडून मान्सूनपूर्व पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि परिसर स्वच्छतेवर पनवेल महापालिकेच्या वतीने विशेष भर देण्यात येत आहे. या अनुषंगाने खारघर विभाग प्रभाग समिती 'अ' अंतर्गत प्रभाग क्र. ४ मधील सेक्टर १९ परिसरातील देवदर्शन सोसायटी ते पूजा सोसायटीदरम्यान असलेल्या ओपन नाल्याची पोकलेन मशिनच्या सहाय्याने साफसफाई सुरू आहे. या नालेसफाई कामाची पाहणी मंगळवारी (दि. १९) महापौर नितीन पाटील यांनी केली.

महापौरांसोबत सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक प्रवीण पाटील, मधू पाटील, वासुदेव पाटील, नरेश ठाकूर, ब्रिजेश पटेल, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, आरोग्य विभागप्रमुख अनिल कोकरे, आरोग्य निरीक्षक जितेंद्र मढवी आदी उपस्थित होते.



स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात या उपक्रमांतर्गत प्रभाग क्रमांक ४मध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान फॉगिंग, स्प्रेईंग, कचरावेचक वाहन व घंटागाडीच्या माध्यमातून परिसर स्वच्छता करण्यात आली. यावेळी महापौर नितीन पाटील यांनी पाहणी करून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेतला.

यावेळी महापौरांनी दुर्लक्षित ठिकाणांची स्वच्छता करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार विविध ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता निरीक्षक अतुल मोहोकर, कुणाल गायकवाड, संदीप भोईर, अजय ठाकूर, पराग पाटील, मितेश गायकर, फवारणी विभाग पर्यवेक्षक धनंजय म्हात्रे, स्वच्छतादूत व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कळंबोली शहरात विविध ठिकाणी महापौर नितीन पाटील यांनी नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. नागरिकांना पूरस्थितीला सामोरे जावे लागू नये यासाठी नाल्यांची स्वच्छता व पाण्याचा सुरळीत निचरा होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौरांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देत नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

या पाहणीदरम्यान उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक रवींद्र भगत, विजय खानावकर, नगरसेविका मोनिका महानवर, सरस्वती काथारा, रविशेठ पाटील, रामदास महानवर, केशव यादव यांच्यासह विभागातील नागरिक उपस्थित होते.

# रायगडातील ६२.७८ टक्के मतदारांचे मॅपिंग

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम सुरू केली आहे. यात मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. रायगड जिल्ह्यात २५ लाख ४५ हजार ७९२ मतदारांची पडताळणी होणार आहे. जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांत या मोहिमेपूर्वी ६२.७८ टक्के मतदारांचे मॅपिंग करण्यात आले आहे, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बुधवारी (दि. २०) पत्रकार परिषदेत दिली.

विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात जिल्ह्यातील मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. एसआयआर महिमेपूर्वी जिल्ह्यात मतदार मॅपिंग करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात २५ लाख ४५ हजार ७९२ मतदारांपैकी १५ लाख ९८ हजार १७६ मतदारांचे मॅपिंग केले गेले आहे. जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारासंघांत ६२.७८ टक्के मतदारांचे मॅपिंग झाल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.



श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात ८६.९७ टक्के, पनवेलमध्ये ३०.४५ टक्के, कर्जतमध्ये ७१.५५ टक्के, उरण ५६.३७ टक्के, पेण ८३.०४ टक्के, अलिबाग ७३.९२ टक्के आणि महाड मतदारसंघात ८१.२४ टक्के मतदारांचे एसआयआर माहिमेपूर्वी मॅपिंग करण्यात आले आहे.

जिल्ह्यात एकूण दोन हजार ७९० मतदान केंद्र असून एसआयआर मोहिमेसाठी दोन हजार ७९० बीएलओंची नेमणूक करण्यात आली. २० ते २९ जून या कालावधील बीएलओंना प्रशिक्षण देऊन पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्टला मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दावे व हरकती नोंदविता येतील. ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे पत्रकार परिषदेस उपस्थित होते.

# अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे आगामी काळात स्थिर व अखंड विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. केवळ सौर आणि पवन उर्जेवर दीर्घकालीन औद्योगिक विकास शक्य नसून अणुऊर्जा (न्यूक्लिअर पॉवर) ही भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. २०) येथे केले.



यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया अंतर्गत आयोजित न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूट आणि यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशीप फोरमच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबलगन, महाजनकोचे मुख्य कार्यकारी अधिकारी राधाकृष्णन बी., मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे यांच्यासह अमेरिकेतील न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मारिया ग्रेस कोर्सनिक, सेंट्रस एनर्जीचे उपाध्यक्ष डॅन लिस्टिको, क्लीन कोअर थोरियम एनर्जीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेहुल शाह, न्यूक्लिअर कर्टिस-राइट कॉर्पोरेशनचे उपाध्यक्ष गॅरी वोल्स्की, यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा, एडलो इंटरनॅशनल कंपनीचे अध्यक्ष जॅक एडलो, तसेच होल्टेक एशियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि धोरणात्मक भागीदारी प्रमुख अनंत जैन यांच्यासह विविध अमेरिकन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जगभरात ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत मोठे बदल होत आहेत. गेली अनेक वर्षे सौर आणि पवन ऊर्जा ही नवीकरणीय ऊर्जा हीच भविष्यातील ऊर्जा समस्या सोडवेल, अशी धारणा होती. मात्र आता वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे स्थिर व सातत्यपूर्ण वीज निर्मितीची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. महाराष्ट्र सौर आणि पवन उर्जेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असला तरी कार्बनमुक्त आणि औद्योगिक स्तरावरील बेसलोड ऊर्जा पुरवठ्यासाठी न्यूक्लिअर ऊर्जा अत्यावश्यक ठरणार आहे. महाराष्ट्र हा ६६० अब्ज डॉलर अर्थव्यवस्थेचा देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असून भारतातील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्क्यांहून अधिक गुंतवणूक महाराष्ट्रात येते. मुंबई आणि नवी मुंबई परिसरात देशातील जवळपास ६० टक्के डेटा सेंटर क्षमता केंद्रित आहे. आगामी काळात सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, लॉजिस्टिक्स आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे विजेची मागणी अनेक पटींनी वाढणार आहे.

भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्याबाबत गेल्या काही वर्षांत अनेक सकारात्मक बदल झाले असून खासगी क्षेत्राचा सहभाग, 'शांती' फ्रेमवर्कअंतर्गत सुधारणा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. भारत हा आगामी अनेक दशकांत वेगाने वाढणारी वीज मागणी असलेला देश ठरणार असून महाराष्ट्र हा त्यातील सर्वात मोठा औद्योगिक घटक ठरणार आहे.

दरम्यान, भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पुढील प्रवासात महाराष्ट्र केंद्रस्थानी ठरणार आहे, असेदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

# अल्पावधीत नफा देण्याच्या आमिषाने ६६ लाखांची ऑनलाईन फसवणूक

## अलिबागच्या नागरिकाला फेसबुक लिंकद्वारे घातला गंडा

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेअर बाजारात गुंतवणूक करा आणि अल्पावधीत मोठा नफा मिळवा, असे आमिष दाखवत अलिबागमधील एका नागरिकाची तब्बल ६६ लाख ५४ हजार ३६३ रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात सायबर भामट्यांविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू आहे.

सायबर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागच्या शिवनगर-चेंढरे येथील फिर्यादी यांना फेसबुकच्या माध्यमातून एका अज्ञात व्यक्तीकडून लिंक पाठविण्यात आली होती. या लिंकच्या माध्यमातून आरोपींनी फिर्यादीशी संपर्क साधून शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा मिळतो, असा विश्वास निर्माण केला.

सुरुवातीला आरोपींनी ऑनलाईन डेमो दाखवत गुंतवणुकीत मोठा परतावा मिळत असल्याचे भासविले. आकर्षक नफ्याचे आकडे, बनावट व्यवहार आणि खोटे आर्थिक अहवाल दाखवून फिर्यादीचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगण्यात आले.

फिर्यादी यांनी आरोपींच्या सांगण्यावरून विविध खात्यांमध्ये मोठ्या रकमा जमा केल्या. काही दिवसांनंतर गुंतवणुकीवरील नफा काढण्याचा प्रयत्न केल्यावर तांत्रिक कारणे, अतिरिक्त शुल्क आणि खाते पडताळणीच्या नावाखाली आणखी पैशांची मागणी करण्यात आली. त्यानंतर संबंधित व्यक्तींशी संपर्क तुटल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादी यांच्या लक्षात आले.

या प्रकारानंतर फिर्यादी यांनी सायबर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार सायबर पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० (२००८ सुधारणेसह) कलम ६६ (डी) तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३१६ (२) आणि ३१८ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल जाधव करीत असून संबंधित बँक खाती, मोबाईल क्रमांक, आयपी अ‍ॅड्रेस आणि डिजिटल व्यवहारांची माहिती तपासली जात आहे. फसवणुकीतील रक्कम देशाबाहेरील खात्यांमध्ये वळविण्यात आली आहे का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

वाढत्या ऑनलाईन गुंतवणूक फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर सायबर पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले. सोशल मीडियावरून येणाऱ्या अनोळखी लिंक, जलद नफ्याची हमी देणाऱ्या योजना आणि अनधिकृत ट्रेडिंग ॲप्सपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले. कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित कंपनीची अधिकृत नोंदणी, सेबी मान्यता व व्यवहारांची सत्यता तपासावी, असेही पोलिसांनी स्पष्ट केले.

# सूर्यघर योजनेत रायगड जिल्हा आघाडीवर; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला रायगड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून महावितरणच्या भांडुप व कल्याण परिमंडलात सर्वाधिक लाभार्थी रायगड जिल्ह्यातील असल्याचे समोर आले आहे. पेण मंडळाच्या माध्यमातून आतापर्यंत तब्बल ६ हजार १५१ घरगुती ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसवून योजनेचा लाभ घेतला आहे. त्यामुळे रायगड जिल्हा या योजनेच्या अंमलबजावणीत आघाडीवर ठरला आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत घरगुती ग्राहकांना छतावर सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणात अनुदान दिले जात आहे. महिना ३०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्यासोबतच अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळविण्याची संधी या योजनेमुळे उपलब्ध झाली आहे. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील ग्राहकांकडून या योजनेकडे मोठ्या प्रमाणावर कल वाढताना दिसत आहे.

महावितरणच्या माहितीनुसार भांडुप व कल्याण परिमंडलात एकूण १३ हजार ४४८ घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले आहेत. यामध्ये पेण परिमंडळाने सर्वाधिक आघाडी घेतली असून, रायगड जिल्ह्यातील ग्राहकांनी योजनेचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे. भांडुप परिमंडलातील ठाणे मंडळात ४३९, वाशी मंडळात २ हजार १३२ तर पेण मंडळात तब्बल ६ हजार १५१ ग्राहकांनी लाभ घेतला आहे. याशिवाय कल्याण परिमंडलातील विविध मंडळांमध्ये मिळून ४ हजार ७२६ ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला आहे. रायगड जिल्ह्यात पर्यावरणपूरक ऊर्जा वापराकडे वाढता कल, वाढती वीजदर चिंता आणि दीर्घकालीन बचतीचा विचार करता सूर्यघर योजनेला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

**लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान**

या योजनेत एक किलोवॅट क्षमतेसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये इतके अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले जाते. एक किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्मिती होते. त्यामुळे घरगुती वापरासाठी लागणारी वीज मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असून अतिरिक्त वीज महावितरणला विकण्याची सुविधाही ग्राहकांना मिळत आहे. दरम्यान, राज्य सरकारने गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील ग्राहकांसाठी 'स्मार्ट' योजना सुरू केली असून, दारिद्र्य रेषेखालील ग्राहकांना केवळ २ हजार ५०० रुपयांत सौर प्रकल्प उपलब्ध होणार आहेत. अनुसूचित जाती-जमाती ग्राहकांना ५ हजार तर सामान्य आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांना १० हजार रुपये लाभार्थी हिस्सा भरावा लागणार आहे.

# पालीत भव्य रोजगार मेळावा संपन्न; तरुणाईला रोजगाराची सुवर्णसंधी

**पाली : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुधागड तालुका मराठा समाज आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल यांच्या संयुक्त विद्यमाने पाली येथे एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले. पाली येथील मराठा समाज भवनमधील स्व. सटूराम सखाराम साजेकर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या भव्य रोजगार मेळाव्याला सुधागड तालुक्यासह पाली शहरातील शेकडो सुशिक्षित बेरोजगार मुला-मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे अनेक उमेदवारांची जागेवरच मुलाखत घेऊन त्यांना तात्काळ नोकरीचे कॉल लेटर सुपूर्द करण्यात आले.



हा भव्य मेळावा सुधागड मराठा समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. सुधागड तालुक्यातील तरुण-तरुणींना त्यांच्या हक्काच्या रोजगाराच्या सुवर्णसंधी उपलब्ध करून देणे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. यावेळी रामदास साजेकर यांनी राज्यगीत गायले. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांमधील हजारो पदांच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. ग्रामीण भागातील अनेक गरजू व हुशार तरुणांनी या संधीचे सोने करत आपले भविष्य सुरक्षित केले. ग्रामीण भागातच, घराच्या जवळ नामांकित कंपन्यांच्या मुलाखती देण्याची संधी मिळणे आणि थेट हातात नोकरीचे कॉल लेटर मिळणे हा ग्रामीण भागातील तरुणांसाठी अत्यंत सुखावह क्षण होता. यामुळे उपस्थित तरुण-तरुणी आणि त्यांच्या पालकांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पहायला मिळाले.

यावेळी उमेदवारांचे योग्य समुपदेशन करून त्यांच्या मुलाखती घेण्यासाठी 'यशस्वी अकॅडमी फॉर स्किल'चे तज्ज्ञ अधिकारी मीडिया मॅनेजर (पुणे) योगेश रांगणेकर व सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी रोजगार मेळाव्यात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. ज्ञानेश्वर गोफण असोसिएट मीडिया विभाग,

आशिष कुमार टीम लीडर, भरती विभाग, प्रमोद गांजहंस मोबिलायझेशन एक्झिक्युटिव्ह, सत्यम आवारी व अक्षय जाधव मोबिलायझेशन ऑफिसर, बाळकृष्ण म्हात्रे फिल्ड सुपरवायझर व राहुल परदेशी सुपरवायझर या सर्व तज्ज्ञ चमूने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मुलाखतींचे आयोजन करून योग्य उमेदवारांची निवड केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उद्योग व रोजगार समिती प्रमुख अमित दंत यांनी केले. केतन म्हस्के यांनी अत्यंत प्रभावीपणे सूत्रसंचालन केले, तर कार्याध्यक्ष बळीराम निंबाळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अवकाळी : रायगडातील ८९९ घरांचे नुकसान

**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रायगड जिल्ह्यात ८९९ घरांचे नुकसान झाले. तळा तालुक्यात विजेचा धक्का लागून १४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला असून अन्य दोन जण जखमी झाले. मागील आठवड्यात रायगड जिल्ह्यातील अनेक भागात वादळी पाऊस झाला. यात तळा तालुक्यात विजेचा धक्का लागून १४ वर्षीय वेदांत साळुंखे याचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. या पावसामुळे जिल्ह्यात घरांचे, गोठ्यांचे तसेच पोल्ट्री व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे. सुधागड तालुक्यात निलेश गणपत तळेकर यांच्या पोल्ट्री शेडचे मोठे नुकसान झाले असून सुमारे दीड ते दोन हजार कोंबड्या मृत्युमुखी पडल्या आहेत.

सुधागड तालुक्यात ४२८ पया घरांचे अंशतः नुकसान झाले असून ४२ कच्च्या घरांचेही नुकसान झाले आहे. याशिवाय पाच गोठे आणि तीन पोल्ट्री शेड बाधित झाल्याची नोंद प्रशासनाकडे करण्यात आली आहे. महाड तालुक्यात ५० घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. खालापूर तालुक्यात २० ते ३० घरांचे नुकसान झाले असून म्हसळा तालुक्यात १० घरांचे नुकसान झाले आहे. पोलादपूर तालुक्यात १११ घरांचे, दोन गोठ्यांचे तसेच नऊ सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान झाले आहे. कर्जत तालुक्यात १३ कच्च्या घरांचे अंशतः नुकसान झाले असून तीन गोठे आणि एका पोल्ट्री शेडचे नुकसान झाले आहे.

# 'सिडको गृहनिर्माण योजनांसंदर्भात नागरिकांनी आमिषांना बळी पडू नये'

**सिडको : रामप्रहर वृत्त**

सिडको गृहनिर्माण योजनांसंदर्भात कोणत्याही आमिषांना तसेच मध्यस्थ किंवा प्रतिनिधी असल्याचे भासवणाऱ्या कोणत्याही व्यक्तींना बळी न पडण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. सिडको महामंडळामार्फत नवी मुंबईतील विविध नोडमध्ये गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या गृहनिर्माण प्रकल्पातील रिक्त सदनिकांची विक्री ही केवळ सिडकोद्वारे जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांनुसार करण्यात येते. सद्यस्थितीत 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' (My Preferred CIDCO Homes) व एफसीएफएस (FCFS) या गृहनिर्माण योजना राबविण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरित सदनिकांच्या विक्रीकरिता नवीन गृहनिर्माण योजनेवर काम चालू आहे. तरी इच्छुक अर्जदारांनी सदर योजनांचा लाभ घ्यावा.

सिडकोने बांधलेल्या सदनिका चेट पद्धतीने वाटप करण्याचे सिडकोचे धोरण नाही. तसेच वाटप झालेल्या सदनिकांची संपूर्ण रक्कम सिडकोकडे फक्त ऑनलाइन पद्धतीनेच भरणे गरजेचे आहे. सिडको कोणत्याही प्रकारची रक्कम चेक अथवा कॅश पद्धतीने घेत नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

सदनिकांच्या वितरणासाठी किंवा त्यासंबंधित कोणत्याही कामासाठी सिडकोतर्फे कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार किंवा प्रॉपर्टी एजंट म्हणून नियुक्त केलेले नाही. त्यामुळे सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी अशाप्रकारचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या आमिषाला अथवा प्रलोभनांना बळी पडू नये. सिडको गृहनिर्माण योजनांसंदर्भात सिडकोतर्फे जारी करण्यात येणारी प्रसिद्धी पत्रके, सिडकोचे अधिकृत संकेतस्थळ, सिडकोची समाजमाध्यमांवरील अधिकृत खाती यांद्वारे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी आर्थिक व्यवहार केल्यास त्यास सिडको जबाबदार राहणार नाही.

दरम्यान, मध्यस्थ म्हणवणारी कोणतीही व्यक्ती अर्ज विक्री करणे, सिडकोच्या नावाने पैसे उकळणे, फसवणूक करणे किंवा तत्सम गैरप्रकार करत असल्याचे आढळल्यास, महाव्यवस्थापक (गृहनिर्माण). २ रा मजला, रायगड भवन, सीवीडी बेलापूर, टोल फ्री क्रमांक -१८००२१०८०००, ०२२६७९१८०००, ९१६६२३२३१५/मेल : customercare@cidcohomes.com येथे कृपया तात्काळ संपर्क साधावा.

# नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ५०४ धोकादायक इमारतींची यादी जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२६-२०२७ या वर्षासाठी विभागवार सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ५०४ इमारती या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

यामध्ये अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे अशा 'सी-१' प्रवर्गामध्ये मोडणा-या ५२ इमारती तसेच इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ ए' प्रवर्गामध्ये मोडणा-या १०२ इमारती आणि इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ बी' प्रवर्गामध्ये मोडणा-या २९७ इमारती त्याचप्रमाणे इमारतीची किरकोळ दुरूस्ती या 'सी-३' प्रवर्गामध्ये मोडणा-या ५३ इमारती, अशाप्रकारे एकूण ५०४ धोकादायक इमारतींची यादी घोषित करण्यात आलेली आहे.

ही यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर 'विभाग' सेक्शनमध्ये 'अतिक्रमण विभाग' माहितीच्या सेक्शनमध्ये 'सामान्य माहिती' या अंतर्गत अवलोकनासाठी सहज उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या यादीमध्ये अतिधोकादायक,




राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करण्याच्या 'सी१' प्रवर्गामध्ये नमूद ५२ इमारतींची नावे व तपशील नागरिकांना सहज कळावा यादृष्टीने ठळक (BOLD) अक्षरात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार घोषित इमारतींमध्ये वास्तव्य करणारे मालक/भोगवटादार यांना ते राहत असलेली इमारत निवासी/वाणिज्य वापराकरिता धोकादायक असलेबाबत आणि या इमारतींमधील निवासी /वाणिज्य वापर तात्काळ थांबविणेबाबत तसेच धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील दि. ०५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार लेखी सूचना/नोटीस देण्यात आलेल्या आहेत. 'सी-१' प्रवर्गातील इमारतीची विदयुत व जलजोडणी खंडीत करण्यात येईल, असेही यात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

अशा धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे मालक अथवा भोगवटादार यांनी ते रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचा संभव लक्षात घेऊन सदर इमारतीचा/बांधकामाचा निवासी/वाणिज्य वापर त्वरित बंद करावा आणि सदरची इमारत/बांधकाम विनाविलंब तोडून टाकावे असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची कार्यवाही न केल्यास, सदर इमारत/बांधकाम कोसळल्यास होणा-या नुकसानीस फक्त संबंधित जबाबदार असतील, महापालिका यास जबाबदार राहणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## दुखवटा

### अशोक शहा



**चौक** : येथील अशोक शिवलाल शहा यांचे शनिवारी (दि. १६) अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या अंत्यविधीस सामाजिक, राजकीय अशा विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते. मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी अनेक माणसे जोडली. त्यांची शोकसभा रविवारी (दि. २४) दुपारी ४ ते ६ वेळेत राहत्या घरी होणार आहे. दशक्रिया विधी सोमवारी (दि. २५), अकरावे व बारावे बुधवार २७ मे रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे, तर उत्तरकार्य गुरुवारी २८ मे रोजी राहत्या घरी चौक येथे होणार आहे.

## निवडक

### स्मार्ट बाजारातून वस्तूंची चोरी

**नवीन पनवेल :** स्मार्ट बाजारातून ५३ हजार ७११ रुपयांच्या वस्तूंची चोरी केल्याप्रकरणी चार अनोळखी महिलांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १८ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मुकुल बीस्ट हे रिलायन्स रिटेल कंपनी लिमिटेडचे स्मार्ट बाजार, ओरियन मॉल पनवेल येथे काम करतात. यावेळी रिलायन्स स्मार्ट बाजार येथे विक्रीसाठी ठेवलेल्या डायनामिक्स, अमूल, गोवर्धन आणि इतर कंपनीच्या तुपाच्या १०४ बॅग चार अनोळखी महिलांनी चोरून नेल्या. याप्रकरणी पनवेल पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### पाठलाग केल्याप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** लग्नास नकार कळवल्यावरदेखील तरुणीचा पाठलाग करून धमकी दिल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात १८ मे रोजी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी या २६ वर्षीय असून आरोपी प्रतीक भिसे याला त्यांनी नकार कळवला. त्यानंतरदेखील तो त्यांना वारंवार कॉल करत होता आणि मी पुढे काय करायचे ते बघतो असे बोलून धमकी दिली. तसेच आरोपी अक्षय खोरेनेसुद्धा फिर्यादीचा भाऊ याच्या मोबाइल क्रमांकावर कॉल करून त्याला धमकी दिली तसेच फिर्यादीची इच्छा नसताना प्रतिक भिसे याने तिचा वारंवार पाठलाग करून धमकी दिली.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत एक अनोळखी बेवारस मयत इसम वय अंदाजे ३५ वर्षे ही पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत बस डेपोच्या बाहेरील बाजूस असलेल्या उड्डाणपुलाखाली आढळून आला आहे. अनोळखी बेवारस इसम रंग – सावळा, उंची अंदाजे ५ फूट, ५ इंच, चेहरा उभट, अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे, दाढी वाढलेली मिशीचे केस काळे वाढलेले अशा वर्णनाचा पुरुष इसम आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक अनंत परागे मो.नंबर ८७७९६५९५०८ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मद्य बाटल्या, रोख रकमेची चोरी

**नवीन पनवेल :** चोरांनी रेस्टॉरंट तसेच दूध डेअरी आणि पान शॉपचे लोखंडी शटर उचकटून आत प्रवेश केला आणि १६ हजार ४४० रुपयांचे मद्य, रोख रक्कम, सिगारेटच्या पाकिटांची चोरी केली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे १९ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ मे रोजी मध्यरात्री २ ते सकाळी साडेसातच्या दरम्यान पद्मा बार अँड रेस्टॉरंट, नवीन पनवेल येथून चोरांनी रोख रक्कम, मोबाइल आणि मद्याच्या बाटल्या चोरून नेल्या, तर सरिता दूध डेअरीमधून ५०० रुपयांची चिल्लर चोरली. तसेच खुशी पान शॉपमधून रोख रक्कम आणि सिगारेटची पाकिटे चोरून नेली.

### टँकरच्या धडकेत कारचे नुकसान

**नवीन पनवेल :** टँकरने कारला दिलेल्या धडकेत कारचे मोठे नुकसान झाले. या अपघाताप्रकरणी अवधेश कुमार रामसंबध मिश्रा या टँकर चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे १९ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृष्णा वाघे (राहणार लाडिवली) हे टाटा पंच गाडी क्रमांक एमएच ०६ डीए ५९७३ ने सामान खरेदी करण्यासाठी डी मार्ट, नवीन पनवेल या ठिकाणी जात होते. यावेळी टँकर क्रमांक एम एच ०४ केएफ ३३८३ वरील चालकाने मद्यप्राशन करून टँकर भरधाव वेगाने चालवला आणि कृष्णा वाघे यांच्या कारला पाठीमागून उजव्या बाजूने धडक दिली. यावेळी कारच्या उजव्या बाजूच्या पाठीमागील दार चेपले गेले. तसेच पाठीमागील उजव्या बाजूचा टायर फुटला आणि मडगार्ड तुटून नुकसान झाले. हा अपघात दुपारी २ वाजण्याच्या सुमारास कोन पोलीस चौकीसमोर पनवेल लेनवर घडला.

### खेळाच्या मैदानात मद्यपींचा वावर

**पनवेल :** खारघरमधील सेक्टर १६ येथील खेळाच्या मैदानावर पालिकेने सुरक्षा रक्षकांची संख्या कमी केल्यानंतर पुन्हा मद्यपींचा वावर वाढल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीती पसरली आहे. रात्रीच्या वेळी मैदानावर दारू पार्ट्या होत असल्याचे समोर आले आहे. यापूर्वीही या मैदानावर मद्यपानाचे प्रकार उघडकीस आल्यानंतर स्थानिक जय हिंद स्पोर्ट्स क्लब यांनी पालिकेकडे तक्रार केली होती. त्यानंतर काही काळासाठी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते, मात्र अलीकडेच रक्षकांची संख्या कमी होताच पुन्हा गैरप्रकार सुरू झाल्याचे दिसून येत आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार भूखंड क्रमांक १३ वरील मैदानात काही तरुण रात्री उशिरापर्यंत मद्यपान करून रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक ग्लास आणि कचरा टाकून जातात. रात्री दुचाकी व चारचाकी वाहनांद्वारे मद्यपी मैदानात येतात. पालिकेचे उपायुक्त प्रसंजीत कार्लेकर यांनी याबाबत सुरक्षा विभागाकडे चौकशी केली जाईल, असे सांगितले आहे.

## स्वायत्त महाराष्ट्र संघर्ष समितीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

स्वायत्त महाराष्ट्र संघर्ष समितीची बैठक नवीन पनवेल येथील बांठिया शाळेमध्ये पार पडली. बैठकीदरम्यान "आर्टिकल १९" (स्वातंत्र्याचा अधिकार)मध्ये दुरूस्ती करण्याची गरज का आहे तसेच महाराष्ट्रासाठी राज्याचा स्वतंत्र नागरिकत्व कायदा का असावा याविषयी सविस्तर कायदेशीर व सामाजिक पैलूंवर माहिती देण्यात आली. स्वायत्त महाराष्ट्र संघर्ष समितीच्या माध्यमातून स्थानिकांचा रोजगार, मराठी भाषेचे संवर्धन आणि मराठी शाळांचे प्रश्न यांवर सातत्याने काम सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीला संघटनेचे अध्यक्ष प्रमोद मसुरकर आणि सरचिटणीस अमरीश पाथरे प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीचे आयोजन करण्यात महत्त्वपूर्ण पुढाकार घेणारे संघटनेचे उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा समन्वयक मिलिंद प्रधान, विजय औटी आणि संजय धुरी यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. संघटनेचे विचार आणि ध्येय धोरणे पाहून या बैठकीत अनेक नवीन सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यामध्ये प्रामुख्याने अ‍ॅड. लिना महाडिक, सीमा तांबोळी, योगेश तांबोळी, प्रभाकर पंडित, पुंडलिक कारागीर आणि अनिल पाटकर यांचा समावेश होता.

# आपटा विभागातील १२ वाड्या-वस्त्यांमध्ये विकासाचा झंझावात

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

आपटा पंचायत समिती गणातील दुर्गम वाड्या-वस्त्यांमधील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी पनवेलच्या पंचायत समिती सभापती रंजना वास्कर यांनी मंगळवारी (दि. २०) आक्रमक क्षेत्र दौरा केला. चार ग्रामपंचायतींमधील १२ गावांना भेटी देऊन त्यांनी पाणीपुरवठा, शिक्षण व बालसंगोपन व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. सकाळपासून संध्याकाळपर्यंत गावभेट, नागरिकांशी थेट संवाद साधला. सभापती वास्कर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दिवसभर आपटा विभाग पिंजून काढला.



**पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वास्कर यांचा आढावा दौरा**

ग्रामपंचायत आपटा हद्दीतील सारसई, सोनारवाडी, खडकीचीवाडी, टोकाची वाडी, बागेचीवाडी, गोविंदावाडी, टपोरावाडी व गंगेचीवाडी ग्रामपंचायत, चावणे हद्दीतील चावणे, सवणे व कालीवली ग्रामपंचायत, जांभिवली ग्रामपंचायत, कराडे खुर्द प्रत्येक ठिकाणी सभापतींनी ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्र व नळ पाणीपुरवठा योजनांची प्रत्यक्ष पाहणी केली. ग्रामस्थ, महिला व विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांनी अडीअडचणी जाणून घेतल्या. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा योजनांवर विशेष भर देण्यात आला. पंचायत समिती सदस्य मयूर शेलार व पाणीपुरवठा अभियंता चव्हाण यांनी प्रत्येक योजनेची तांत्रिक माहिती सादर केली. जिथे पाणीपुरवठा विस्कळीत आहे तिथे तातडीने दुरुस्ती करण्याचे व टँकरची पर्यायी व्यवस्था करण्याचे आदेश सभापतींनी दिले.

या आढावा दौऱ्यात स्थानिक नेतृत्व मोठ्या संख्येने उपस्थित होते. कराडे खुर्दचे माजी सरपंच विजय मुरकुटे, जांभिवलीच्या माजी सरपंच रिया रवींद्र कोंडिलकर, आपटा ग्रामपंचायत उपसरपंच असद पिटू, सदस्या संगीता लक्ष्मण बावधने, सदस्य राजू देशमुख, सामाजिक कार्यकर्ते संकेत पाटील (कालीवली), संदीप पाटील (चावणे), जयंत कोंडिलकर, कल्पेश कोंडिलकर, कराडे खुर्दचे ग्रामपंचायत सदस्य नितेश कारंडे आदी या वेळी उपस्थित होते.

ग्रामीण भागाचा विकास हाच आमचा श्वास आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहचला पाहिजे. शाळा, अंगणवाडी व पाणी या पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही सभापती रंजना वास्कर यांनी दौऱ्यादरम्यान दिली. या दौऱ्यामुळे दुर्गम भागातील प्रश्नांना चालना मिळाली असून रखडलेली विकासकामे मार्गी लागतील, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

## पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत तपासणी मोहीम

**पनवेल : बातमीदार**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्यामार्फत रस्ते सुरक्षेसाठी तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी सातत्याने विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत असून सर्व सुजाण नागरिकांनी रस्त्यावरील होणारे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी व रस्ता सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करावे. तसेच वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, आवश्यक कागदपत्रे (विमा, परवाना, प्रदूषण प्रमाणपत्र) अद्ययावत ठेवावीत व सुरक्षित वाहन चालन करावे, असे आवाहन सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल निलेश धोटे यांनी केले आहे.





प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल कार्यालयाने सन २०२५–२६ व एप्रिल २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मोहिमेंतर्गत रस्ता सुरक्षेच्या अनुषंगाने विना हेल्मेट, अवैध विमा वाहन चालविताना मोबाइलचा वापर, वैद्य पीयूसी प्रमाणपत्रे नसलेली वाहने, अवैध प्रवासी वाहतूक, विना नंबरप्लेट रस्त्यावर चालणारी वाहने, ऑटो रिक्षा नियमभंग, ओडिसी वाहतूक करणारी वाहने, वैध परवाना नसलेली वाहने अशा प्रकारच्या विविध गुन्ह्यांसाठी या कार्यालयातर्फे निरंतर विशेष मोहिमा राबविण्यात येतात.

गौण खनिज व ओव्हरलोड मालवाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष तपासणी मोहिमा व कडक कारवाई करण्यात येत आहे. या कारवाई अंतर्गत गेल्या दोन महिन्यांत साधारणतः २३५ वाहनांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. एकूण तडजोड शुल्क १२८.९६ लाख इतके आकारण्यात आले आहे.

## ‘सीकेटी’च्या आयुष म्हात्रेचे सुयश

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील सीकेटी विद्यालयातील विद्यार्थी आयुष शिरीष म्हात्रे याने नुकत्याच झालेल्या दहावीच्या परीक्षेत ९१ टक्के गुण मिळवून सुयश संपादन केले आहे. त्याच्या या उज्ज्वल यशाबद्दल अनेकांनी विशेष करून शिक्षकांनी आयुषचे अभिनंदन केले आहे. मला जे यश मिळाले ते माझे मार्गदर्शक सर व माझ्या आई-वडिलांच्या प्रोत्साहनामुळे मिळाले, असे आयुषने नम्रपणे सांगितले.



## पावणेनऊ लाखांची फसवणूक

**नवीन पनवेल :** गुंतवणूक केलेल्या रुपयांच्या नफ्यावर ३० टक्के कमिशन देण्याचे आमिष दाखवले आणि आठ लाख ९५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपीने फिर्यादी सुहास फडतरे (रा. सेक्टर २२, कामोठे) यांना फेसबुकवर मेसेज पाठवला. त्यानंतर व्हॉट्सअप नंबर पाठवून त्यामध्ये क्रिप्टो करंसी प्लॅटफॉर्मबद्दल माहिती दिली. यावेळी आरोपीने सुहास यांना जास्त गुंतवणूक केली तर शंभर टक्केपेक्षा जास्त नफा मिळेल असे सांगितले. यावेळी सुरुवातीला त्यांनी दहा हजार रुपये गुंतवले. त्यांना ११ हजार ७९७ इतकी रक्कम परताव्यासह बँक खात्यात जमा केली. नंतर फसवणूक झाली.

## खारघर सेक्टर १० येथे विजेचा लपंडाव

**कळंबोली :** खारघर सेक्टर १० परिसरात मे महिन्यात वाढलेल्या उष्णतेदरम्यान वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवसभरात अनेक वेळा बत्ती गुल होत असल्यामुळे नागरिकांना उकाड्याचा मोठा सामना करावा लागत असून महावितरणच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार दरवर्षी उन्हाळा सुरू होताच परिसरात वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनतो. वारंवार वायर जळणे, तांत्रिक बिघाड होणे अशा कारणांमुळे तासन्‌तास वीजपुरवठा खंडित राहत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

## हनुमंत लभडे आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या व विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या २००७ मोहोपाडा निसर्ग क्लिनिकल लॅबोरेटरीने गेल्या अनेक वर्षांत समाजासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. या उल्लेखनीय सेवाकार्यासाठी कल्याण पश्चिम येथील ब्राम्हण सभागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ. भास्कर वाघ यांच्या हस्ते भारतीय पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट आणि जीवन वेलनेस एंटरप्राइजेस यांच्या वतीने हनुमंत लभडे यांना प्रतिष्ठेचा ‘आरोग्यरत्न’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.



लॅबच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना सातत्याने सेवा देत सामाजिक बांधिलकी जपली आहे. कोविडच्या महामारीच्या कठीण काळात नागरिकांना वेळेवर तपासण्या व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात लॅबोरेटरीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच आदिवासीवाडी व शाळांमध्ये आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती आणि आरोग्यसेवा पुरवून समाजोपयोगी कार्य केले. अनेक वर्षे विविध क्षेत्रांत उत्कृष्ट व समाजहिताचे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची परंपरा संस्थांकडून जपली जात असून हनुमंत लभडे यांच्या सन्मानामुळे परिसरात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## खारघरमधील ज्येष्ठ नागरिकाची ६.४३ कोटींची सायबर फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील एका ६१ वर्षीय सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाला शेअर बाजार आणि आयपीओमध्ये मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून तब्बल सहा कोटी ४३ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

खारघर सेक्टर १७ मधील ड्रीम पॅराडाईस सोसायटीत राहणाऱ्या या ज्येष्ठ नागरिकाशी २० एप्रिल रोजी एका अनोळखी व्यक्तीने समाजमाध्यमांनंतर मोबाइलवर संपर्क साधला. संबंधित व्यक्तीने शेअर बाजार आणि आयपीओमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी फारलॉन कॅपिटल एशिया पीटीई लिमिटेड या कंपनीचे सेबीकडे नोंदणीकृत असल्याचे कथित प्रमाणपत्रही पाठविण्यात आले.

यानंतर विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने रक्कम जमा करण्यास सांगण्यात आले. गुंतवलेली रक्कम आणि त्यावरील नफा सुरक्षित असल्याचे भासविण्यासाठी ‘फारलॉन’ नावाचे अ‍ॅप वापरण्यात आले. या अ‍ॅपवर गुंतवलेली रक्कम आणि वाढलेला परतावा दिसत असल्याने ज्येष्ठ नागरिकाचा विश्वास अधिक दृढ झाला. दरम्यान, संबंधित अ‍ॅपवर त्यांच्या खात्यात सहा कोटी ४१ लाख ३१ हजार २०० रुपये असल्याचे दाखविण्यात आले, मात्र गुंतवलेली ही रक्कम काढण्याचा प्रयत्न केल्यानंतरही प्रत्यक्षात मिळत नसल्याचे १६ मे रोजी त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

## जेएनपीए बंदराचे कामकाज सुरळीत; प्रशासनाने दिले स्पष्टीकरण

**उरण : बातमीदार**

जेएनपीए बंदरातील पाचही बंदरांतील कामकाज कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरळीत सुरू आहे. सध्याची अडचण ही बंदर टर्मिनल्समध्ये नसून कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएस) आणि कस्टम ब्रोकर्स (सीबी) यांच्याकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या ट्रेलर्स आणि चालकांच्या कमतरतेमुळे निर्माण झाली आहे, असे स्पष्टीकरण जेएनपीए प्रशासनाने दिले आहे.

सीएफएस आणि सीबी यांची जबाबदारी टर्मिनल यार्डमध्ये ठेवण्यात आलेले आयात कंटेनर्स हे सीएफएस किंवा सीबी यांच्याकडून ट्रेलर्स उपलब्ध करून दिल्यानंतरच वितरित केले जातात. पुरेशा संख्येने ट्रेलर्स उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. सुट्ट्या किंवा अनुपस्थितीमुळे चालक उपलब्ध नसल्यास पर्यायी व्यवस्था तातडीने करणे आवश्यक आहे. टर्मिनल्समध्ये ट्रेलर्सची कोणतीही प्रलंबित रांग नाही: कंटेनर वितरण प्रक्रिया जलद करण्यासाठी टर्मिनल्सकडून अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. लोडिंगसाठी ट्रेलर्स प्रतीक्षेत असल्याची कोणतीही परिस्थिती नाही. उलट चालकांच्या कमतरतेमुळे टर्मिनलमध्ये येणाऱ्या ट्रेलर्सची संख्या कमी झाली आहे.

जेएनपीएची एकूण कंटेनर साठवण क्षमता १.७६ लाख टीईयू इतकी आहे. सामान्य परिस्थितीत ऑक्युपन्सी ९०,००० ते १,००,००० टीईयू दरम्यान असते. मध्यपूर्वेतील भू-राजकीय परिस्थितीमुळे ट्रान्सशिपमेंट कार्गोमध्ये वाढ झाल्याने ७ मे २०२६ रोजी ऑक्युपन्सी १.१८ लाख टीईयू इतकी नोंदविण्यात आली असून, ती एकूण क्षमतेच्या केवळ ६७% आहे. यापैकी फक्त २६,००० टीईयू हे ट्रान्सशिपमेंट कंटेनर्स असून, त्यामुळे कोणतीही गर्दी निर्माण झालेली नाही. ऑक्युपन्सीमध्ये झालेली वाढ ही केवळ सीएफएस आणि सीबी यांच्याकडून ट्रेलर्सच्या उपलब्धतेत झालेल्या विलंबामुळे आहे.

जेएनपीए स्पष्ट करते की, बंदरातील कामकाजात कोणतीही गर्दी किंवा अडथळा नाही, मात्र आयात कंटेनर्सची प्रलंबित स्थिती दूर करण्यासाठी सीएफएस व कस्टम ब्रोकर्स यांनी तातडीने पुरेशा संख्येने ट्रेलर्स आणि चालकांची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. कंटेनर्सच्या वाहतूक व निकासीची प्राथमिक जबाबदारी सीएफएस आणि सीबी यांच्यावरच आहे. जेएनपीए ग्राहकांना सर्वोत्तम सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे. टर्मिनल यार्डमधून आयात कंटेनर्सची सुरळीत निकासी सुनिश्चित करण्यासाठी सीएफएस व कस्टम ब्रोकर्स यांनी तातडीने पुरेशा ट्रेलर्स आणि चालकांची व्यवस्था करावी, असे आवाहन जेएनपीएकडून करण्यात आले आहे.





**पनवेल : येथील महानगरपालिकेचे नगरसेवक रवींद्र भगत यांचा वाढदिवस नुकताच सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी भाजप प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, नगरसेविका सरस्वती काथारा यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी नगरसेवक रवींद्र भगत यांचे अभिष्टचिंतन केले. आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत नगरसेवक भगत यांनी सामाजिक बांधिलकी जपत कळंबोली येथील एमजीएम हॉस्पिटल परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता.**

## संपादकीय

# स्वप्नपूर्तीच्या संकल्पास पाठबळ

भारत आता केवळ पारंपरिक महासत्तांच्या मर्जीवर अवलंबून राहणारा देश राहिलेला नाही, असा स्पष्ट संदेश नॉर्डिक राष्ट्रांच्या शिखर परिषदेतून भारताने जगाला दिला आहे.

**इराण-अमेरिका युद्धामुळे भारतासमोर उभ्या राहिलेल्या आर्थिक, मानवी आणि राष्ट्रीय सुरक्षिततेशी संबंधित आव्हानांना सामोरे जातानाच, आता गडद होत असलेल्या ऊर्जासंकटामुळे अर्थव्यवस्थेवर पडणारा ताण काहीसा सैल करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नॉर्डिक परिषदेतील उपस्थिती महत्वाची भूमिका बजावणार आहे. सध्याच्या युद्धस्थितीचा परिणाम केवळ भारतावरच नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थांवर होत असताना, त्याचा भारतावरील प्रभाव कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युद्धस्थितीच्या पूर्वकाळातच देशाला दिली होती. या संघर्षाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणामांना सामोरे जाण्यासाठी केंद्र सरकार एका धोरणावर काम करत असल्याचे पंतप्रधानांचे वक्तव्य केवळ देशवासियांना दिलासा देण्यापुरते शाब्दिक नव्हते. नॉर्डिक परिषदेत भारताची भूमिका मांडताना त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांमधूनही त्याचे पुरेसे पुरावे मिळाले आहेत. पश्चिम आशियातील संघर्षातून निर्माण झालेल्या जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर नॉर्वेमधील ओस्लो येथे झालेली तिसरी नॉर्डिक शिखर परिषद भारताच्या धोरणात्मक सुरक्षिततेसाठी महत्वाची ठरली असून, नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क आणि आईसलँड हे नॉर्डिक देश भारताचे नैसर्गिक भागीदार म्हणून उदयास येत आहेत, ही बाब या परिषदेमुळे अधोरेखित झाली आहे. जगातील एक प्रमुख तेल आणि गॅस निर्यातदार असलेल्या नॉर्वेसह नॉर्डिक देशांसोबत झालेल्या दीर्घकालीन करारांमुळे आगामी दीड दशकातच ऊर्जा पुरवठा आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाची ग्वाही भारतास मिळाली आहे. डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, फिनलंड आणि आइसलँड या नॉर्डिक देशांसोबत भारताने हरित तंत्रज्ञान, संरक्षण, आर्क्टिक संशोधन, डिजिटल पायाभूत सुविधा आणि मुक्त व्यापार या क्षेत्रांत सहकार्य वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला असून हवामान बदल, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, नितळ अर्थव्यवस्था आणि 6जी तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत संयुक्त संशोधन व गुंतवणुकीचा मार्ग खुला झाला आहे. भारताच्या परराष्ट्र नीतीच्या दृष्टीने देखील ही परिषद महत्वाची ठरली आहे. एका बाजूला रशियासोबत ऊर्जा व संरक्षण क्षेत्रातील सहकार्याची भागीदारी मजबूत करतानाच, युरोपमधील प्रगत, तंत्रज्ञानसमृद्‌ध आणि पर्यावरणाबबत जागरूक असलेल्या देशांशीही धोरणात्मक नाते जोडण्याच्या प्रयत्नांतून भारताने आपली राजनैतिक स्वायत्तता सिद्‌ध केली आहे. नॉर्डिक परिषद हे त्यासाठी सज्जड निमित्त ठरले. हरित विकास हा केवळ पर्यावरणापुरता सीमित विषय नसून आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत करणारे आर्थिक आणि भू-राजकीय साधन आहे, हे या परिषदेत भारताने स्पष्ट केले. विकसित भारत हे पंतप्रधान मोदी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अक्षय ऊर्जा, कार्बन-कपात, स्मार्ट शहरे, हरित जहाजबांधणी, अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि कृत्रिम बुद्‌धिमत्ता आणि डिजिटल प्रशासनात जगात अग्रस्थानी असलेल्या नॉर्डिक देशांचे सहकार्य मिळाले, तर विकसित भारताचे पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेस वेग येईल. नॉर्डिक परिषदेतील पंतप्रधानांच्या उपस्थितीची या कारणांमुळे नोंद घ्यावी लागेल. थोडक्यात, बदलत्या जागतिक शक्तिसमीकरणात भारत कोणत्याही एका गटाकडे झुकलेला राहणार नाही, तर विविध शक्तिकेंद्रांशी समांतर संबंध ठेवून स्वतःची स्वतंत्र जागतिक भूमिका निर्माण करेल, असा स्पष्ट संदेश या शिखर परिषदेतून भारताने दिला आहे. नॉर्डिक देशांसोबतचे सहकार्य हे त्या व्यापक नव्या भारतीय परराष्ट्र नीतीचेच एक आधुनिक, हरित आणि तंत्रज्ञानाधारित रूप मानावे लागेल.**

# उन्हाळ्यात जनावरांना होणारी विषबाधा आणि उपाययोजना



उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या काळात जनावरांमध्ये उष्माघात, पाण्याची कमतरता, पचनाचे विकार यांसह विषबाधेच्या घटनाही वाढताना दिसतात. विषबाधा ही गंभीर समस्या असून वेळेवर उपचार न झाल्यास जनावरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांनी या विषयाबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे.

विषबाधा होण्याची प्रमुख कारणे : उन्हाळ्यात चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे जनावरे अनेकदा उपलब्ध असलेली कोणतीही वनस्पती खातात. यामध्ये धोतरा, आकोडा, करट, रानमेथी यांसारख्या विषारी वनस्पतींचा समावेश असू शकतो. अशा वनस्पतींचे सेवन केल्यास जनावरांना विषबाधा होण्याची शक्यता वाढते. याशिवाय शेतात फवारणी केलेल्या चाऱ्यावर राहिलेले कीटकनाशकांचे अंश, रासायनिक खते किंवा औद्योगिक रसायनांचा संपर्क हे देखील विषबाधेचे महत्त्वाचे कारण आहे. काही वेळा कुजलेला किंवा बुरशी लागलेला चारा जनावरांना दिला जातो. अशा चाऱ्यातून तयार होणारे विषारी घटक जनावरांच्या शरीरात जाऊन गंभीर परिणाम करतात.

प्लास्टिक, कचरा, तेलकट पदार्थ किंवा रंगयुक्त वस्तू खाल्ल्याने जनावरांच्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. तसेच औषधांचा अति प्रमाणात किंवा चुकीच्या पद्‌धतीने वापर केल्यासही विषबाधा होऊ शकते.

विषबाधेची लक्षणे : विषबाधा झाल्यानंतर जनावरांमध्ये काही ठळक लक्षणे दिसून येतात. भूक मंदावणे किंवा पूर्णपणे बंद होणे, तोंडातून फेस येणे, लाळ गळणे, बेचैनी, इकडे-तिकडे धावणे, श्वास घेण्यास त्रास होणे, पोट फुगणे किंवा जुलाब होणे अशी लक्षणे सामान्यतः दिसतात. गंभीर अवस्थेत स्नायूंमध्ये कंप सुटणे, डोळे फिरणे किंवा अचानक मृत्यू होण्याची शक्यता देखील असते. त्यामुळे अशी लक्षणे दिसताच त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

तत्काळ उपाययोजना : विषबाधा झाल्याचा संशय आल्यास सर्वप्रथम जनावराला विषारी पदार्थांपासून दूर करावे. तोंडामध्ये उरलेले विषारी पदार्थ काढून टाकावेत आणि स्वच्छ, थंड पाणी पाजावे. कोणतेही घरगुती उपाय किंवा औषधे स्वतःहून देऊ नयेत. तातडीने जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योग्य उपचार घ्यावेत. वेळेवर उपचार मिळाल्यास जनावराचा जीव वाचविणे शक्य होते.

प्रतिबंधात्मक उपाय : विषबाधा टाळण्यासाठी शेतकरी व पशुपालकांनी काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जनावरांना देण्यात येणारा चारा व खाद्यपदार्थ स्वच्छ व दर्जेदार असावा. कीटकनाशके आणि रसायने सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. शेतातील विषारी वनस्पती ओळखून त्या नष्ट कराव्यात. जनावरांच्या गोठ्याभोवती स्वच्छता राखणे, नियमित पशुवैद्यकीय तपासणी करणे आणि पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे.

उन्हाळ्यात जनावरांची योग्य काळजी घेतल्यास विषबाधेचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. शेतकऱ्यांनी जागरूक राहून प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहून आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. जनावरे ही शेतकऱ्यांची महत्त्वाची संपत्ती असल्याने त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक पशुपालकाची जबाबदारी आहे.

**-जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा**

# सोमनाथ 'स्वाभिमान पर्व': श्रद्धेच्या विजयाची आणि भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाची १००० वर्षे

भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर, जिथे अथांग अरबी समुद्र भगवान शिवाच्या चरणांचे प्रक्षालन करतो, तिथे उभे असलेले प्रभास पाटनचे सोमनाथ मंदिर केवळ एक वास्तू नाही, तर ते भारताच्या अजेय आत्मसन्मानाचे जिवंत प्रतीक आहे. शिवपुराणात उल्लेखिलेल्या द्‌वादश ज्योतिर्लिंगांमधील प्रथम स्थान म्हणून सोमनाथाचे महत्व अनन्यसाधारण आहे, परंतु आज जेव्हा आपण २०२६ या वर्षात पदार्पण केले आहे, तेव्हा हे मंदिर एका ऐतिहासिक कालखंडाचे साक्षीदार म्हणून आपल्यासमोर उभे आहे.

हे वर्ष भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. या वर्षाचे महत्व दोन प्रमुख कारणांसाठी आहे. जानेवारी १०२६ मध्ये आक्रमक महमूद गजनीने सोमनाथ मंदिरावर पहिले भीषण आक्रमण केले होते. या घटनेला या वर्षात १००० वर्षे पूर्ण होत आहेत. हे पर्व त्या सर्व वीर आत्मबलिदानांचे स्मरण करण्याचे निमित्त आहे, ज्यांनी या मंदिराच्या रक्षणासाठी आणि अस्मितेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. तसेच मे १९५१ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते नूतन सोमनाथ मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली होती. या ऐतिहासिक घटनेला २०२६ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजेच, हे वर्ष सोमनाथ मंदिराच्या 'अमृत महोत्सवा'चेही आहे.

शतकानुशतके परकीय आक्रमकांनी या मंदिराला लुटले, त्याची मोडतोड केली. त्यांचा उद्देश केवळ संपत्ती लुटणे हा नव्हता, तर भारताचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कणा मोडणे हा होता. परंतु, प्रत्येक आक्रमणाने भक्तांची श्रद्‌धा अधिकच दृढ झाली. जितक्या वेळा हे मंदिर पाडले गेले, तितक्याच जोमाने भारतीयांनी पुन्हा त्याची उभारणी केली.

स्वातंत्र्यानंतर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथच्या पुनर्बांधणीचा जो संकल्प सोडला, तो केवळ एका मंदिराचा जीर्णोद्‌धार नव्हता, तर तो गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होणाऱ्या भारताचा उद्‌घोष होता. सरदार पटेलांचा हाच वारसा पुढे नेण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

सोमनाथ हे केवळ शिवाचे धाम नाही, तर ते भगवान श्रीकृष्ण आणि शक्तीच्या उपासनेचेही पावन स्थान आहे. हे मंदिर प्राचीन काळापासून भारताचे आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र राहिले आहे. येथील 'स्वाभिमान पर्वा'चा उद्देश आपल्या गौरवशाली वारशाची ओळख नव्या पिढीला करून देणे हा आहे. 'स्वाभिमान पर्व' हे केवळ उत्सवाचे साधन नसून, ते आपल्या सामूहिक संकल्पाचे प्रतीक आहे.

सोमनाथ मंदिराची कथा ही विजयाची कथा आहे. अन्यायावर न्यायाच्या, विनाशावर सृजनाच्या आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाची. १०२६ मधील त्या काळरात्रीपासून सुरू झालेला हा प्रवास आज २०२६ मध्ये एका वैभवशाली भारताच्या उदयापर्यंत येऊन पोहोचला आहे. सोमनाथचा हा जिर्णोद्‌धार जगाला सांगतो की, भारत आता केवळ स्वतंत्र झालेला देश नाही, तर तो आपली प्राचीन ओळख आणि वैभव पुन्हा प्राप्त करणारा 'विश्वगुरु' बनण्याच्या मार्गावर असलेले राष्ट्र आहे.

या 'स्वाभिमान पर्वा'च्या निमित्ताने आपण सर्वजण या पवित्र भूमीला नमन करूया आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी व संस्कृतीच्या रक्षणासाठी कटिबद्‌ध होऊया.

**-ॲड. आकाश फुंडकर, कामगारमंत्री, महाराष्ट्र राज्य**

## बदलते तंत्रज्ञान

# 'एअरटेल'ने लॉन्च केली ५जी नेटवर्किंग स्लिसिंग सेवा

भारतीय टेलिकॉम कंपनी Airtelने आपल्या पोस्टपेड ग्राहकांसाठी एक मोठी घोषणा केली आहे. कंपनीने ग्राहकांसाठी 'प्रायोरिटी पोस्टपेड' (Priority Postpaid) ही नवीन प्रीमियम सेवा लॉन्च केली आहे. ही सेवा अत्यंत प्रगत अशा '५G नेटवर्क स्लाइसिंग' तंत्रज्ञानावर आधारित असल्याचा दावा कंपनीने केला आहे. यामुळे ग्राहकांना गर्दीच्या ठिकाणीही अधिक स्थिर आणि हाय-स्पीड इंटरनेटचा अनुभव मिळणार आहे.




वर्क फ्रॉम होम, महत्त्वाचे व्हिडीओ कॉल्स, लाईव्ह स्ट्रीमिंग किंवा ऑनलाईन कामे करणाऱ्या आणि सतत सुपरफास्ट इंटरनेटची गरज असणाऱ्या ग्राहकांना डोळ्यांसमोर ठेवून ही सेवा डिझाईन करण्यात आली आहे.

सोप्या भाषेत सांगायचे तर, हे तंत्रज्ञान एखाद्या हायवेवरील 'व्हिडिओ व्हीआयपी लेन' सारखे काम करते. नेटवर्क स्लाइसिंग तंत्रज्ञानामुळे एअरटेल आपल्या मुख्य ५G नेटवर्कला वेगवेगळ्या व्हर्च्युअल भागांमध्ये विभागणार आहे. यामुळे अत्यंत गर्दीच्या ठिकाणी किंवा हाय-ट्रॅफिकच्या वेळीही 'प्रायोरिटी पोस्टपेड' ग्राहकांसाठी इंटरनेटचा एक वेगळा मार्ग उपलब्ध असेल, ज्यामुळे इंटरनेट स्पीड आणि कनेक्टिव्हिटी कधीही कमी होणार नाही.

अमेरिकेसह सिंगापूर, ब्रिटन आणि मलेशिया यांसारख्या प्रगत देशांमध्ये ही सेवा आधीपासून उपलब्ध आहे. मात्र, भारतात अशा प्रकारची सेवा सुरू करणारी एअरटेल ही पहिलीच कंपनी ठरली आहे.

एअरटेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी शाश्वत शर्मा यांनी सांगितले की, एअरटेलमध्ये आमचा भर ग्राहकांचा अनुभव अधिक समृद्‌ध करणाऱ्या अर्थपूर्ण नवकल्पना सादर करण्यावर आहे. ५G स्लायसिंग तंत्रज्ञानावर आधारित 'प्रायोरिटी पोस्टपेड' ही आमची नवीनतम सेवा आहे. ग्राहक ट्रॅफिकमध्ये अडकलेला असो, एखाद्या गर्दीच्या कॉन्सर्टमध्ये लाईव्ह स्ट्रीम पाहत असो किंवा गजबजलेल्या बाजारात कॅब बुक करत असो, 'प्रायोरिटी पोस्टपेड' त्याला सर्वोत्तम नेटवर्कचा अनुभव देईल.

एअरटेलच्या सध्याच्या सर्व पोस्टपेड ग्राहकांना या सेवेचा लाभ ऑटोमॅटिकली (काहीही न करता) मिळणे सुरू होईल, तर जे प्रिपेड ग्राहक आहेत, ते 'Airtel Thanks App' किंवा जवळच्या 'Airtel Store'मध्ये जाऊन 'Priority Postpaid'मध्ये स्विच करू शकतात.

# लेखक, समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी

## निमित्त



कला क्षेत्रातील मौलिक समीक्षेबद्दलचा सन्मान म्हणून फ्रेंच सरकारतर्फे 'कला-साहित्य क्षेत्राचा शिलेदार' ही पदवी मिळवणारे ज्ञानेश्वर नाडकर्णी साहित्याचे आणि कलांचे जाणकार समीक्षक म्हणून मराठी साहित्यात प्रसिद्‌ध होते. त्यांची आज जयंती...

ज्ञानेश्वर गणपत नाडकर्णी यांचा जन्म जोगेश्वरी, मुंबई येथे २१ मे १९२८ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण सर नारायण चंदावरकर शाळा, माध्यमिक शिक्षण राम मनोहर व चिकित्सक समूह या शाळांतून झाले. एलफिन्स्टन आणि विल्सन महाविद्यालयात एमएपर्यंतचे (इंग्रजी) शिक्षण. लेखनाची आवड शाळेपासून. १९४९पासून 'मौज' साप्ताहिक आणि 'सत्यकथा' यांतून स्फुटलेखन, 'तुकाराम शेंगदाणे' या टोपण नावाने.

१९५१ ते १९५३ या काळात भारतीय हाय कमिशनरच्या परराष्ट्र खात्यात नोकरीनिमित्त इंग्लंडमध्ये वास्तव्य. काही वर्षे शिल्पी या जाहिरात संस्थेत आणि फ्री प्रेस जर्नल, फिनान्शिअल एक्सप्रेस यांमध्ये सहसंपादक म्हणून काम पाहिले.

ज्ञानेश्वर नाडकर्णींचे नाव मराठी साहित्यात प्रामुख्याने घेतले जाते, ते त्यांच्या चोखंदळ आणि मार्मिक अशा साहित्य आणि नाट्य, चित्रपट आणि चित्रकला या क्षेत्रांतल्या समीक्षेसाठी. 'मराठी नाटक आणि रंगभूमी' (१९६३), 'भारतीय चित्रपट सृष्टीतले नवे प्रवाह' (१९७४), 'पिकासो' (१९८६), 'हिचकॉक' (१९९०), 'अश्वत्थाची सळसळ' (१९८८), 'प्रतिभेच्या पाऊलवाटा' (२००३) अशा पुस्तकांतून त्यांनी भारतीय आणि

पाश्चात्त्य साहित्य, रंगभूमी, चित्रपट आणि चित्रकला या क्षेत्रांतल्या नामवंतांचा आणि त्यांच्या कलांचा समर्पक परिचय देऊन त्यांच्या कलेची सखोल

समीक्षा करून समीक्षा क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. त्याचबरोबर 'Balgandharva and the Marathi Theater' आणि 'Gaitonde' ही दोन समीक्षात्मक पुस्तके इंग्लिशमध्ये लिहिली आहेत.


'दोन बहिणी' (१९५६), 'कोंडी' (१९५८), 'चरित्र' (१९८९), 'नजरबंद' (१९९१), 'वलयांकित' (१९९६) या त्यांच्या कादंबर्या आणि 'चिद्‌घोष' (१९६६), 'प्रस्थान' (१९८८) हे काही कथासंग्रह प्रसिद्‌ध आहेत.

परदेश वास्तव्यातील वेगळे आणि समृद्‌ध अनुभव, तिथल्या कलाक्षेत्रातली सूक्ष्म निरीक्षणे, पारशी, ख्रिस्ती अशा वेगळ्या समाजांतील उच्चभ्रू वर्गाच्या बहुरंगी जीवनाची जवळून ओळख, त्या जगातल्या अनुभवांवर आधारित कथा व कादंबरी लेखन हे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे, वाचकांचे कुतूहल वाढवणारे आहे. ललित लेखन करण्याची क्षमता असूनही नाडकर्णींचा ओढा समीक्षेकडे अधिक असल्याचे जाणवते.

फ्रेंच सरकारच्या पदवी व्यतिरिक्त नाडकर्णींना संगीत नाटक अकादमीची शिष्यवृत्ती, मराठी नाट्यपरिषदेचे वि.स.खांडेकर पारितोषिक, 'चिद्‌घोष'-(कथा) ललित पारितोषिक, 'प्रस्थान'-(कथा) केशवराव कोठावळे पारितोषिक, ललितकला अकादमी आणि फिल्म सेन्सार बोर्डाचे सदस्यत्व; असे बरेच सन्मान आणि पुरस्कार लाभले आहेत. ज्ञानेश्वर नाडकर्णी हा कलासमीक्षेच्या क्षेत्रातला परवलीचा शब्द ठरला आहे. त्यांचे २३ डिसेंबर २०१० रोजी निधन झाले.

**-मंदाकिनी भारद्वाज**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यातील 'या' पाच चुका करू करतात शरीराचे नुकसान

उन्हाळ्यात तब्येत चांगली ठेवण्यासाठी कितीतरी गोष्टींची काळजी घ्यावी लागते. जास्त घाम येणं आणि त्यामुळे डिहायड्रेशन होणं या गोष्टी तर खूप जास्त होतात. अशात शरीर थंड ठेवणं आणि स्वच्छतेची काळजी घेणं फार महत्त्वाचं ठरतं.



या दिवसांमध्ये केली जाणारी सगळयात कॉमन चूक म्हणजे लोक पाणी पिण्यासाठी तहान लागण्याची वाट बघतात. यामुळे डोकेदुखी, थकवा, चक्कर येणे आणि पचन बिघडणे अशा समस्या होऊ लागतात. यापासून बचावासाठी गरजेचं आहे की, थोड्या थोड्या वेळाने घोटभर पाणी पित रहा. आपल्या आहारात लिंबू सरबत, छाछ, नारळपाणी आणि कलिंगडाचा समावेश करा.

उन्हाळा सुरू होताच फ्रिजमधील चिल्ड पाणी किंवा बर्फाचं पाणी पिण्याची सवय अनेकांना असते. या थंड पाण्याने थोडावेळ आराम मिळू शकतो, पण शरीराच्या आतील तापमानासाठी हा मोठा झटका ठरू शकतो. अचानक थंड पाणी प्यायल्याने रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि पचन तंत्र स्लो होतं.

उन्हाळ्यात घाम येणे आलंच, पण वर्कआउटनंतर किंवा बाहेरून आल्यावर तासन्तास त्याच घामाने भिजलेल्या कपड्यांमध्ये बसून राहिल्याने स्वच्छतेच्या दृष्टीने मोठी चूक आहे. घाम आणि ओलाव्यामुळे त्वचेवर बॅक्टेरिया आणि फंगस वेगाने वाढतात. यामुळे घामोळ्या, फंगल इन्फेक्शन आणि शरीरातून दुर्गंधी येण्याची समस्या होऊ शकते. घामाचे कपडे जास्तवेळ घालून राहू नका. दिवसातून दोनदा आंघोळ करा. सूती कपडे वापरा.

घाम आणि चिकटपणा टाळण्यासाठी अनेक लोक दिवसातून चार ते पाच वेळा चेहरा साबणाने किंवा फेस वॉशने धुतात, मात्र त्यामुळे त्वचेवरील नॅचरल ऑइल नष्ट होतं, ज्यामुळे त्वचा कोरडी होते. अशात त्वचा स्वतःला हायड्रेट ठेवण्यासाठी जास्त तेल तयार करते, ज्यामुळे पिंपल्स येतात. ही समस्या टाळायची असेल तर दिवसातून केवळ दोनदा साध्या पाण्याने चेहरा धुवावा.

स्वच्छतेसंबंधी उन्हाळ्यात केली जाणारी आणखी एक कॉमन चूक म्हणजे लोक टॉवेल आणि अंडरगारमेंट्स नियमितपणे धुवत नाहीत. तेच पुन्हा वापरले जातात. उन्हाळ्यात या गोष्टींमध्ये बॅक्टेरिया वेगाने पसरतात, ज्यामुळे स्किन इन्फेक्शन आणि यूरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनसारख्या गंभीर आजारांचा धोका असतो.

# रात्रफेरीच्या बसेसचा पेण थांबा बंद करण्याची प्रवाशांची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



रायगड विभागातील सहा आगाराच्या बसेसना पेण स्थानकात थांबा देण्यात आला आहे. रात्रफेरीच्या बसेसचा पेण थांबा बंद करण्यात यावा, अशी मागणी आता प्रवाशांनी केली आहे.

श्रीवर्धनसह अलिबाग, रोहा, मुरुड, माणगाव आणि महाड आगारांच्या बसेस सेवा या मुंबई शहरासह ठाणे, नालासोपारा, भाईंदर, बोरीवली या उपनगरात मार्गस्थ होत असतात. दिवस फेर्या व रात्र फेर्यांच्या बसेसना जाते-येते वेळी पेण स्थानकात अल्पोपहारासाठी थांबा दिला आहे.मुंबई गोवा महामार्गावरून पेण स्थानक हे एक किलोमीटर अंतरावर असल्याने या थांब्यामुळे प्रवासाचा कालावधी वाढत आहे.रात्र फेरीच्या बसेस ना पेण स्थानकात थांबा दिला असल्याने रात्रीच्या वेळी उपाहारगृह बंद अवस्थेत आणि प्रसाधनगृहाच्या वाटेवर वीज व्यवस्था नसल्याने प्रवाशांना अंधारात चाचपडत प्रसाधनगृह गाठावे लागते. या कारणास्तव प्रवाशांना रात्रीच्या प्रवासासाठी पेण स्थानक गैरसोयीचे वाटायला लागले आहे.

पेण स्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही तसेच रात्रीच्या वेळेस खाद्य पदार्थ उपलब्ध नसतात.स्थानक परिसरात अंधार त्यातच अनेक बसेस प्रसाधनगृहाच्या वाटेवर उभ्या केलेल्या असतात.बसेसच्या मागे एखादी दुर्घटना घटना अथवा महिलांच्या बाबतीत काही असभ्य वर्तन झाल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न प्रवासी वर्गाने उपस्थित केला आहे.

पेण स्थानकापासून काही अंतरावर सर्व सुख सोयींनी सुसज्ज असे रामवाडी स्थानक आहे.स्वच्छ प्रसाधनगृह व रात्री वेळी उपहारगृह खुले असल्याने रात्रपाळीच्या बसेसना रामवाडी स्थानकात थांबा द्यावा, जेणेकरून प्रवाशांची विशेष करून ज्येष्ठ नागरिक व महिला वर्गाची गैरसोय होणार नाही.

# विजेच्या खेळखंडोब्याने नागरिक हैराण

**माणगाव : बातमीदार**

ऐन उन्हाळ्यात माणगाव परिसरात सतत खंडित होणारा वीजपुरवठा, कमी–जास्त दाबाने येणारी वीज आणि एमएसईबीच्या "चालू–बंद" खेळामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. दिवसभरात अनेक वेळा अचानक वीज गायब होणे, रात्री अपरात्री कोणतेही स्पष्ट कारण नसताना वीजपुरवठा खंडित होणे आणि त्यातून घरगुती उपकरणांचे नुकसान तसेच नगरपंचायत नियमीत पाणीपुरवठा वेळापत्रक विस्कळीत होणे एक ना अनेक समस्यांनी सर्वसामान्य ग्राहक पुरते मेटाकुटीला आले आहेत.

महावितरण माणगाव कनिष्ठ अभियंता करंदीकर यांचेशी वारंवार खंडित होणाऱ्या लाईटविषयी माहिती घेतली असता त्यांनी माणगावला वीजपुरवठा करणारी लाईन ही कांदळगाव येथून येते आणि या लाईनवर निजामपूर सेक्शनमधील खेडेगांव आहेत त्याचा देखील लोड येतो. मग कांदळगाव पासुन माणगाव पर्यंत म्हणजे १७ किलोमीटरमध्ये कुठे फॉल्ट झाला तर त्याचा त्रास हा माणगांवला होतो. माणगावची विजेची मागणी पाहता इथे माणगाव शहरासाठी स्वतंत्र फीडरची आवश्यकता आहे. ज्याने हा लाईटचा त्रास दूर होईल, असे म्हटले आहे.

उन्हाळ्याच्या कडाक्यात नागरिकांना आधीच उष्णतेचा सामना करावा लागत असताना, त्यात भर म्हणून सततचा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार सुरू आहे. पंखे, फ्रीज, एसी, टीव्ही, संगणक, मोटारी यांसारखी उपकरणे वारंवार बंद पडत असून ग्राहकांना आर्थिक फटका बसत आहे. दुसरीकडे बिल वेळेत न भरल्यास तत्काळ ऑनलाईन वीज तोडणीची कारवाई केली जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या अस्थिर वीजपुरवठ्याचा परिणाम केवळ घरगुती जीवनापुरता मर्यादित नसून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, दवाखाने, मेडिकल दुकाने, टेस्टिंग लॅबोरेटरी, वातानुकूलित साठवणूक केंद्रे, हॉटेल व्यवसाय, छोटे–मोठे दुकानदार, स्टॉलधारक, तसेच ऑनलाईन शिक्षण व "वर्क फ्रॉम होम" करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही गंभीर परिणाम होत आहे. नगरपंचायतीचा पाणीपुरवठा, बँका, पतसंस्था, महसूल व इतर शासकीय कार्यालयांची कामे देखील वारंवार ठप्प होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिकांनी इन्व्हर्टर, सोलर सिस्टीम किंवा खाजगी जनरेटरचा पर्याय निवडला असला तरी सर्वसामान्य ग्राहक मात्र या समस्येत भरडले जात आहेत. वीजपुरवठ्यावरील वाढते अवलंबित्व आणि त्याचवेळी महावितरणच्या ढिसाळ व्यवस्थेमुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढताना दिसत आहे. दरमहा येणाऱ्या भरमसाठ वीजबिलांबाबतही ग्राहकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. पूर्वी सहा महिन्यांनी येणारे बिल आता दर महिन्याला मोठ्या रकमेचे येत असल्याने कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडत आहे. अनेक वेळा बिल वेळेत न मिळणे तसेच स्मार्ट मीटरसंदर्भातील संभ्रमामुळे ग्राहक अधिकच त्रस्त झाले आहेत.

# दिवेआगरमध्ये लोटला निरंकारी भक्तांचा महासागर

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य व ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या दिवेआगर गावाने नुकतेच एक अद्वितीय आध्यात्मिक पर्व अनुभवले. मानवतेला जोडणारा, प्रेम, शांती व विश्वबंधुत्वाचा संदेश देणारा संत निरंकारी मिशन आयोजित 'संत निरंकारी आध्यात्मिक संत समारोह' अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

दिवेआगरमधील पवित्र व ऐतिहासिक गोठणेश्वर मंदिर परिसरात आयोजित या सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. सकाळपासूनच भाविकांची गर्दी उसळू लागली आणि पाहता पाहता मंदिर परिसर भक्तांच्या जनसागराने भरून गेला. या भव्य कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. यामध्ये सुचिन किर, मोहम्मदशेठ मेमन तसेच मंदार तोडणकर यांचा समावेश होता.


मान्यवरांनी आपल्या भाषणातून संत निरंकारी मिशनच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, आजच्या धावपळीच्या जीवनात अशा आध्यात्मिक कार्यक्रमांमुळे माणसाला आत्मिक शांतता आणि जीवनाची योग्य दिशा मिळते.

## शुध्दीपत्रक

दिनांक ०९/०५/२०२६ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये सौ. अनिता महेश सोनार / अनिता भुवन कोळी, रा. मोरा कोळीवाडा, ता.उरण यांच्या जन्म दिनांकाबाबत जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले आहे. तरी सदरच्या जाहीर प्रगटनामध्ये चौकशी अर्ज क्र.२८४/२०२६ असे नमूद केलेले आहे. तरी त्याऐवजी चौकशी अर्ज क्र.३८४/२०२६ असे वाचावे.

# शिवा मोरेची भारतीय लष्करात निवड

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र.४ मधील उतेखोल गावासाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण ठरलेला आहे. अवघ्या १८ व्या वर्षी कु. शिवा विनोद मोरे यांनी भारतीय सैन्य दलात म्हणजेच इंडियन आर्मीमध्ये यशस्वी निवड मिळवत आपल्या कुटुंबाचे, गावाचे आणि संपूर्ण परिसराचे नाव उज्वल केले आहे. कठोर परिश्रम, अथक मेहनत, शिस्तबद्ध तयारी आणि देशसेवेची प्रबळ जिद्द यांच्या बळावर शिवा यांनी हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या नेत्रदीपक कामगिरीमुळे नगरसेविका ममता थोरे यांनी विशेष कौतुक करून सन्मानचिन्ह देऊन अभिनंदन केले.

अहमदनगर येथे पार पडलेल्या सैन्य भरती प्रक्रियेत तब्बल १०० जागांसाठी सुमारे २ हजार ५०० उमेदवार मैदानात उतरले होते. अत्यंत कठीण आणि स्पर्धात्मक असलेल्या या प्रक्रियेत शिवा मोरे यांनी २०० पैकी तब्बल १८२ गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. सध्या ते पुणे येथील वाडिया महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबतच देशसेवेचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी सातत्याने सराव आणि तयारी केली होती. लहानपणापासूनच भारतीय सैनिक बनण्याची तीव्र इच्छा मनात बाळगणाऱ्या शिवा यांनी अनेक अडचणींवर मात करत स्वतःला सिद्ध केले. शारीरिक क्षमता, मानसिक ताकद, कठोर शिस्त आणि अथक सराव यांच्या जोरावर त्यांनी सैन्य भरतीची कठीण परीक्षा यशस्वीरीत्या पार केली.

त्यांच्या या यशामुळे माणगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे मोरे कुटुंबाची ही चौथी पिढी देशसेवेसाठी सैन्यात दाखल होत आहे. त्यामुळे या यशाला केवळ वैयक्तिक यशाचे नव्हे, तर घराण्याच्या देशभक्तीच्या परंपरेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शिवा यांच्या वडिलांनी त्यांना लहानपणापासूनच सैनिक होण्याची प्रेरणा दिली. त्यांनीच त्यांना कठोर सराव, शिस्त आणि मार्गदर्शन करत घडविले. मुलाच्या यशामुळे मोरे कुटुंबाचे अनेक वर्षांचे स्वप्न अखेर साकार झाले आहे.

भारतीय सैन्यात निवड होणे हे केवळ नोकरी मिळवणे नसून मातृभूमीच्या रक्षणासाठी स्वतःला समर्पित करण्याचा सर्वोच्च सन्मान असतो. देशाच्या सीमांचे रक्षण करत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या जवानांच्या रांगेत आता शिवा मोरे यांचाही समावेश झाला आहे, ही बाब प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची आहे. शिवा यांच्या या यशामागे आई–वडिलांचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रपरिवाराचे प्रोत्साहन यांचे मोठे योगदान असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. गावातील युवकांनी त्यांच्या यशातून प्रेरणा घेत शिस्त, परिश्रम, कर्तव्यनिष्ठा आणि देशसेवेचा आदर्श समोर ठेवावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे. "देशसेवा हीच खरी जीवनसेवा" हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवत शिवा मोरे यांनी आजच्या तरुणाईसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या पुढील सैनिकी कारकिर्दीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत असून, देशसेवेच्या या नव्या आणि पवित्र प्रवासासाठी त्यांना मनःपूर्वक सलाम आणि शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# ज्येष्ठ व्यक्ती समाजाला दिशा देण्याचे काम करतात –नगरसेवक नितीन आंबुर्ले

**मुरुड : प्रतिनिधी**

ज्येष्ठ व्यक्ती यांनी केलेल्या कामाचा त्यांना गाडा अनुभव असतो. अनुभवाच्या शिदोरीवर समाजासाठी चांगल्या गोष्टी घडवून आणतात. आयुष्यभर कष्ट करून समाज घडवला, कुटुंबाला आधार दिला आणि पुढील पिढीला योग्य दिशा दिली. त्यांचे अनुभव हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्याकडून आपण संयम, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा शिकतो. आज त्यांचा सत्कार करून आपण त्यांच्या कार्याबद्दलकृतज्ञता व्यक्त करत आहोत.त्याबरोबर आपल्या शालेय विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि पालकांच्या मेहनतीचे आहे, असे मत नगरसेवक नितीन आंबुर्ले यांनी व्यक्त केले.

शिवशक्ती क्रिडा मंडळ जुनी पेठ मुरुड श्री सत्यनारायणाची महापूजेचे औचित्य साधून जेष्ठाचा व शालेय विद्यार्थीचा गुणगौरव सोहळा श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित कार्यक्रमावेळी ते बोलत होते.

यावेळी शिवशक्ती क्रिडा मंडळाचे अध्यक्ष रूपेश जामकर, उपाध्यक्ष संदीप पोतदार, श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे माजी अध्यक्ष गिरीश साळी, महिला अध्यक्ष राखी गुप्ते, अशोक दांडेकर, उद्योजक सिध्देश कोलवणकर,मंदार कोलवणकर, प्रशांत आबुर्ले, विशाल (बाबू)कोलवणकर,दिलीप जामकर, नितिन डोंगरीकर,जयेश चोडणेकर,अंकेश कोलवणकर, श्रीकांत मिठागरी, अच्युत पोतदार, समिर करंदेकर, ओंकार चोडणेकर आदी उपस्थित होते.

यावेळी सत्कारमूर्ती मुख्याध्यापिका अर्चना खोत मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की प्रत्येक ठिकाणी सत्कार होत असता, पण हा सत्कार माझ्या घराचा जिव्हाळाचा आहे व कधीच मी विसरु शकत नाही. येथे मिळालेले प्रेम, आपुलकी आणि सन्मान आयुष्यभर स्मरणात राहील.

प्रमुख पाहुणे आबुर्ले व मान्यवरांच्या यांच्या हस्ते २० ज्येष्ठ दांपत्य १० उच्च शिक्षित विद्यार्थीचा शाल श्रीफळ व गुलाब व सन्मानचिन्ह तसेच पहिली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना वह्या व पेन देऊन गौरविण्यात आले.



# गो.म. वेदक विद्यामंदिराचे शिष्यवृत्तीत यश

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील श्री.गो.म.वेदक विद्यामंदिर तळाचे २६ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत इ५ वी २ तर इ.८ वी ३ असे पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

त्यामध्ये इयत्ता आठवी शिष्यवृत्ती कु.हर्षवर्धन धनंजय पवार,कु.सई सुहास वावेकर,कु.तेजस्विनी तानाजी भुरे,तर इयत्ता पाचवी कु.जयवर्धन बाबासाहेब जाधव,कु.हर्षद रूपेश ठिगळे हे विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

सदर विद्यार्थी यांची मेहनत व चिकाटी तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांनी नियोजना प्रमाणे नियमित विद्यार्थ्यांचा सराव घेतला आहे.तसेच पालकांचेही चांगले मार्गदर्शन लाभल्याने सदर विद्यार्थी यशस्वी होण्यास मदत झाली आहे.विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेचे नाव उंचावले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून व सर्व स्तरांतून कौतुक केले जात आहे.


## महावितरण – ई–निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-०१, टी-०२, टी-०३ आणि टी-०४ (२०२६-२७) अशा एकुण **चार** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. २१.०५.२०२६ पासून ते दि. २७.०५.२०२६** पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २८.०५.२०२६ ला दुपारी १.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**



## जाहीर नोटीस
### महत्वाची कायदेशीर सूचना

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, आमच्या अशिलाने मे. मुख्य दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात प्रतिवादींना खालील दाव्यातील जमिनींच्या (Suit Lands) संदर्भात व्यवहार करण्यास, विक्री करण्यास, हस्तांतरित करण्यास, बोजा निर्माण करण्यास, कब्जा सोडण्यास, कोणतेही त्रयस्त पक्ष हक्क निर्माण करण्यास, सामंजस्य करार (MOU) करण्यास, वरील कृत्य करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला अधिकार देण्यास आणि/किंवा कोणतीही आगाऊ रक्कम/ इसारा/ पैसे स्वीकारण्यास मनाई करणारा कायमस्वरूपी मनाईहुकूम मिळण्याकामी विशेष दिवाणी दावा क्र. १०२/२०२६ खालील व्यक्तींविरुद्ध दाखल केला आहे:

१. चांगीबाई महादू भल्ला
२. बामीबाई पद्माकर पारधी
३. विशाल पद्माकर पारधी
४. सागर पद्माकर पारधी
५. अंजली पद्माकर पारधी
६. संगीता मंगेश गवंडी
७. ममता राजू चौधरी
८. समीर राजू चौधरी
९. मंगळी मधुकर चौधरी
१०. आंबीबाई मांगल्या पारधी
११. भारत मंगळ्या पारधी
१२. शोभा चंद्रकांत दरवडा
१३. जयश्री साईनाथ भला
१४. प्रकाश काळूराम पारधी ऊर्फ निरगुडा
१५. मंगीबाई अंबाजी पारधी ऊर्फ निरगुडा
१६. सुरेश अंबाजी पारधी ऊर्फ निरगुडा
१७. अशोक माया पारधी
१८. प्रमोद माया पारधी
१९. जयमाला वाण (भगवान) धुमणे
२०. गोमा कमल्या पारधी ऊर्फ दारवडा
२१. आंबो कमल्या पारधी ऊर्फ दारवडा
२२. अनंत बुधाजी ठाकरे
२३. कमलाकर बुधाजी ठाकरे
२४. जयश्री सुकऱ्या वाघ
२५. जनी कमलु वाघ
२६. वसंत आंबो ऊर्फ आंब्या पारधी
२७. चांगुणी काळूराम कांबडी
२८. राधिका रामा चौधरी
२९. गजानन शंकर पारधी
३०. सुकेश शंकर पारधी
३१. कान्ही बाळू ठाकरी ऊर्फ ठाकरे
३२. संगीता बामा सापरा
३३. श्रावण भल्ला
३४. रमेश पाटील
३५. प्रकाश पाटील
३६. सुनील भगत
३७. सुनील भोईर

(ज्यांचा यापुढे **"प्रतिवादी"** म्हणून उल्लेख केला आहे)

त्यानुसार, आमच्या अशिलाने दुय्यम निबंधक, पनवेल यांच्याकडे दि. १५ एप्रिल २०२६ रोजी अनुक्रमांक **PVL-3/6452/2026** अन्वये **"लिस-पेन्डन्स"ची नोटीस (वादलंबित नोटीस)** नोंदविली असून, त्याद्वारे सर्व संबंधितांना आमच्या अशिलाने प्रतिवादींविरुद्ध दाखल केलेल्या विशेष दिवाणी दावा क्र. १०२/२०२६ बाबत सूचना दिली आहे.

या लिस-पेन्डन्स नोटीसमध्ये अशी सूचना देण्यात आली आहे की, विशेष दिवाणी दावा क्र. १०२/२०२६ प्रलंबित असेपर्यंत, खाली नमूद केलेल्या जमिनी:

**गाव: नानोशी, तालुका: पनवेल, जिल्हा: रायगड**

| अ. क्र. | सर्वे नंबर | क्षेत्र (हे. आर. पो.) |
|---|---|---|
| १. | १८ | ३-५८-०० |
| २. | २० | ९-८१-० |
| ३. | ३५ | ७-८५-० |
| ४. | ३६ | ८-२५-० |
| | एकूण क्षेत्र | २९-४९-० |

या जमिनी कोणत्याही प्रतिवादीद्वारे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीद्वारे आमच्या अशिलाच्या हक्कांवर बाधा येईल अशा प्रकारे **हस्तांतरित केल्या जाऊ शकत नाहीत, विकल्या जाऊ शकत नाहीत, त्यावर बोजा निर्माण केला जाऊ शकत नाही किंवा कोणताही व्यवहार केला जाऊ शकत नाही.**

प्रतिवादींपैकी कोणाकडूनही वरील जमिनींबाबत केलेला कोणताही सामंजस्य करार (MOU), विक्री, हस्तांतरण किंवा व्यवहार हा त्यांच्या **कायदेशीर दायित्वांचे उल्लंघन** ठरेल आणि ते दिवाणी आणि/किंवा फौजदारी कायदेशीर परिणामांना पात्र असतील.

आज दिनांक २१ मे २०२६ रोजी पनवेल येथे

**दीपा बिष्ट**
**वकील**
**द्वारा: तिसरा मजला, सुनामा हाऊस,**
**१४०, ऑगस्ट क्रांती मार्ग,**
**शालिमार हॉटेलच्या समोर,**
**केम्प्स कॉर्नर, मुंबई - ४०० ०२६.**
**ईमेल: adv.deepabisht@gmail.com**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

मौजे–मानघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली मिळकत, सदरहू मिळकतीचे गांव नमुना नं.७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्री. किशोर कांतीलाल संघवी यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे–मानघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट/हिस्सा नं. | भूधारणा पध्दती | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २७/२ | भोगवटादार वर्ग–१ | ०–२८–७० | ५=६२ |
| | पोट खराबा | ०–०२–३० | |
| | एकूण क्षेत्र | ०–३१–०० | |

सदरहू मिळकतीत वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वीचा सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क, कूळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंन्डन्स नोटीस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचेकडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजाविरहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलांचे लाभांतील प्रस्तावित खरेदीखतास कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहित धरुन, आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारांत घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

**ठिकाणः– पनवेल**
**दिनांकः– १९/०५/२०२६.**

**सही**
**श्री. जगदीश उरणकर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**ऑफिसः– अ–१०१, आदीत्यप्रज्ञा**
**को. ऑप, हौ. सो., गोखले हॉल शेजारी,**
**पनवेल–४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड**



महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे खालापूर,कार्यालय, ता.पेण , जि. रायगड

दुरध्वनी क्रमांक ०२143/२५२०३६ ईमेल– tahasilpen@gmail.com

**जाहिरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

ठमा यशवंत म्हात्रे,
रा.शिहू, ता. पेण, जि. रायगड. } अर्जदार

**विरुध्द**

ग्रामपंचायत शिहू,
ता.पेण, जि. रायगड. } सामनेवाला

या जाहीर नोटीशीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा विनोद ठमा म्हात्रे यांचा जन्म दिनांक १२/०८/१९७८ रोजी मौजे शिहू, ता. पेण, जि. रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत शिहू, ता.पेण, जि. रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही काही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

**महसूल शाखा–क्र. फौजदारी/कात–४/ जन्म दाखला/२३६/२०२६**
**दिनांक :– ०५/०५/२०२६**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

# नवी मुंबईतील नालेसफाईची महापौर, उपमहापौर, आयुक्तांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका सर्वसाधारण सभेत पावसाळापूर्व कामांविषयी सविस्तर चर्चा झाल्यानंतर आयुक्तांनी नाले व गटार सफाईची पाहणी केली होती. त्यामध्ये ६० ते ८० टक्के कामे पूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त झाला होता व १५ मेपर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन बुधवारी (दि. २०) नालेसफाई व होल्डिंग पाँडची पाहणी केली असून प्रशासनाने समाधानकारक काम केले असल्याचे निदर्शनास येत असून या पावसाळ्यात नागरिकांना त्रास होणार नाही असा विश्वास वाटतो, असे सांगत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी पावसाळापूर्व केलेली कामे तेव्हाच यशस्वी मानता येतील जेव्हा पावसाळ्यात नागरिकांच्या घरात पाणी जाणार नाही, असे मत व्यक्त केले.



मार्गील वर्षी १५ मेपासून पावसाला सुरुवात झाली होती. यावर्षी मात्र पाऊस काहीसा उशिरा येणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्या अनुषंगाने ही सुरु असलेली कामे अशीच गतीमानतेने सुरु ठेवावीत, असे आदेशित करत भर पावसात पुन्हा पाहणी दौरा करणार असल्याचे महापौरांनी सांगितले. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापौर सुजाता पाटील यांनी दिघ्यापासून बेलापूरपर्यंत सुरुवात करत नैसर्गिक नालेसफाई कामांची तसेच विशेषत्वाने होल्डिंग पाँड स्वच्छतेची पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्यासमवेत उपमहापौर दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, आरोग्य समितीचे सभापती डॉ. जयाजी नाथ तसेच आपापल्या विभागांमध्ये तेथील स्थानिक नगरसेवक उपस्थित होते.

दिघा येथील ग्रीन वर्ल्ड जवळील नाल्यामधून एमसीडीसीएलच्या मोठया वायर्स जात असल्याने नाल्यात नागरिकांमार्फत टाकला जाणार कचरा अडकून राहतो. ही परिस्थिती अनेक ठिकाणी निदर्शनास येते, त्यामुळे या वायर्स एकत्रितपणे वरच्या बाजूला बांधून ठेवाव्यात जेणेकरुन प्रवाहातील वाहते पाणी अडणार नाही व रस्त्यावर येणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश महापौर महोदयांनी दिले. या स्वच्छ केलेल्या नाल्यांमध्ये नागरिकांनीही प्लास्टिक बॉटल, प्लास्टिक पिशव्या अथवा कचरा न टाकण्याची दक्षता घ्यावी जेणेकरुन ते पुन्हा अस्वच्छ होणार नाही, असे आवाहनही महापौरांनी केले.

काही ठिकाणी उद्योगसमूहांच्या बाजूने वाहत असलेल्या नाल्यांमध्ये कंपनीच्या बाजूने कचरा टाकला जातो. त्याला प्रतिबंध करण्यासाठी उद्योग समूहांसोबत समन्वय साधण्याचेही महापौरांनी निर्देशित केले. दिघा, ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, एपीएमसी मार्केट, एमआयडीसी क्षेत्र, वाशी, सानपाडा, जुईनगर, नेरुळ, बेलापूर अशा विविध क्षेत्रांमधील नाले सफाईची पाहणी करण्यासोबतच होल्डिंग पाँड क्षेत्रांचीही महापौरांनी पाहणी केली. होल्डिंग पाँडमध्ये ७० ते ८० टक्के गाळ भरलेला असून खारफुटीमुळे गाळ काढण्यास परवानगी मिळत नाही. याबाबत वनमंत्री ना.श्री.गणेश नाईक यांच्यामार्फत परवानगी मिळण्यासाठी प्रयत्न सुरु असून त्याला लवकरच यश येईल असा विश्वास महापौरांनी व्यक्त केला. तोपर्यंत होल्डिंग पाँडच्या जेवढ्या भागाची परवानगी आहे तेथील गाळ काढणे सुरु असून होल्डिंग पाँडच्या ठिकाणी जास्त क्षमतेचे पाणी उपसा पंप बसवले जात आहेत. जेणेकरुन अतिवृष्टी काळात होल्डिंग पाँडमध्ये जमा होणारे पावसाचे पाणी उपसून खाडी भागात टाकण्यात येईल. होल्डिंग पाँड हे नवी मुंबई शहराचे सुरक्षा कवच असून ते संरक्षित राखण्यासाठी गतिमान पावले उचलण्यात येत आहेत, असेही महापौरांनी सांगितले.

# तुर्भे येथील उपोषण स्थगित

## डम्पिंग ग्राउंड, सीबीजी व वेस्ट टू एनर्जी प्रकल्प स्थलांतराची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे स्टोअर येथे ज्येष्ठ नगरसेवक सुरेश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली तुर्भे विभागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या डम्पिंग ग्राउंड, सीबीजी व वेस्ट टू एनर्जी प्रकल्प स्थलांतराच्या मागणीसंदर्भातील आमरण उपोषणाला मंगळवारी (दि. १९) महत्त्वपूर्ण वळण मिळाले.



आंदोलनादरम्यान ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के व शहर अभियंता शिरीष आदरवड यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्याशी संपर्क साधण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत लवकरच या विषयावर बैठक घेऊन ठोस निर्णय होईपर्यंत सीबीजी व वेस्ट टू एनर्जी प्रकल्प सुरू करण्यात येणार नाही, असे आश्वासन देण्यात आले. या आश्वासनानंतर सुरू असलेले आमरण उपोषण स्थगित करण्यात आले.

यावेळी बोलताना सुरेश कुलकर्णी यांनी स्पष्ट केले की, हा लढा केवळ व्यक्तीगत नसून तुर्भे विभागातील सुमारे एक लाख नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि अस्तित्वासाठी आहे. तुर्भे डम्पिंग ग्राउंड, सीबीजी व वेस्ट टू एनर्जी प्रकल्प स्थलांतरित होईपर्यंत हा संघर्ष सुरूच राहणार असून, महानगरपालिकेने मागण्या पूर्ण न केल्यास भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या उपोषणाला मोठ्या संख्येने पाठिंबा देणाऱ्या तुर्भे विभागातील जेष्ठ नागरिक, महिला, युवक-युवती व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आणि पुढील काळातही लोकहिताच्या प्रश्नांसाठी एकत्रितपणे लढा देण्याचे आवाहन केले.

यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे, शिवसेना उपनेते तथा विरोधी पक्षनेते विजय चौगुले, जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, किशोर पाटकर, महिला जिल्हाप्रमुख शीतल कचरे, गटनेते मनोज हळदणकर, युवासेना ठाणे लोकसभा अध्यक्ष ममित चौगुले, जिल्हाप्रमुख अनिकेत म्हात्रे तसेच अनेक नगरसेवक-नगरसेविका व तुर्भे विभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत गव्हाण विद्यालयाचे सात विद्यार्थी उत्तीर्ण

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतरिम निकाल जाहीर करण्यात आला असून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेज, गव्हाणचे सात विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत अंतरिम यादीत खान अरबाज आजम, पाटील रुद्र उदय, शेख अफसर ईसाक, माने मही दिनकर, लोखंडे प्रशांत दत्ता व मोहरकर मोहित मोतीलाल हे सहा विद्यार्थी तर इयत्ता आठवी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अष्टपैलू स्मित कुंदन मोकल हा एक विद्यार्थी असे एकूण सात विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या अंतरिम यादीत पात्र झाले असून अंतिम यादी जाहीर होईल त्यावेळी या विद्यार्थ्यांपैकी शिष्यवृत्तीस पात्र ठरणाऱ्या लाभार्थीस शिष्यवृत्ती प्राप्त होईल.

विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अध्यापकांचे विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्युनिअर कॉलेज विभाग स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य तथा संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख आणि विजयनाना घरत व ॲड. राहुल घरत, विद्यालयाच्या प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले आदींनी अभिनंदन केले.

# मोहोपाडा, शिवनगर ग्रामस्थांतर्फे सरपंच उमा मुंढेंचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा वासांबे ग्रुप ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, उपसरपंच दीपक कांबळे यांचा मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थ यांच्यावतीने ग्रामपंचायत कार्यालयात सत्कार करण्यात आला. मोहपाडा वासांबे ग्रामपंचायत यांनी केंद्र सरकारच्या आत्मनिर्भय अभियान अंतर्गत देशपातळीवर प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.



हा पुरस्कार सन २०२४-२५ या वर्षासाठी जाहीर झाला असून सरपंच उमा मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, उपसरपंच दीपक कांबळे व ग्रामपंचायत सदस्य यांचे ग्राम विकास मंत्री, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे व खालापूर गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी अभिनंदन केले आहे.

मोहोपाडा वासांबे ग्रुप ग्रामपंचायत यांनी स्वतःच्या संसाधनांचा वापर करून स्थानिक स्तरावर विकासाचे प्रयत्न सुरू केले असून योग्य नियोजन केले आहे. नियोजन करताना गावचा विकास आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. आत्मनिर्भय संकल्पनेतून वासांबे ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, उपसरपंच व पंचायत सदस्य आणि कर्मचारी हे ग्राम पंचायतीला गरिबीमुक्त करणे, ग्राम पंचायत हद्दीतील तरुणांना रोजगार निर्मिती उपलब्ध करून रोजगार देणे, केंद्र व राज्य सरकार यांचे अनुदान येईल आणि गावचा विकास होईल, यावर अवलंबून न राहता स्वतः चे उत्पन्न वाढवणे आणि ग्राम पंचायतीला आत्मनिर्भर पंचायत करणे या धैर्याने काम सुरू आहे. ग्रामपंचायत कर, शुल्क आणि स्थानिक मालमत्तेतून उत्पन्न वाढवून विकास केला जात आहे, स्वतःचे आर्थिक स्तोत्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यामुळे वासांबे ग्राम पंचायत यांनी स्थानिक विकास योजना राबवून गावातील शिक्षण, आरोग्य, आणि पायाभूत सुविधांचा विकास केला आहे.

ड्रोन या साधनाचा वापर करून घरांची मोजणी आणि मालमत्ता कार्ड तयार करून नागरिकांना दिल्यामुळे मालमत्तेशी संबंधित वाद कमी होत आहेत. कौशल्य विकासावर भर देऊन तरुणांच्या हाताला काम आणि महिला सक्षमीकरण केले आहे. महिला बचत गटांना प्रोत्साहन देऊन ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. ग्राम पंचायत वासांबे यांच्यावतीने आत्मनिर्भर पंचायत पोर्टल आणि डिजिटल डॅशबोर्डद्वारे काम करून कामात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मालमत्ता कर संकलन, बाजार शुल्क आणि गावातील संसाधनांचा वापर, औद्योगिक क्षेत्रातून सीएसआर फंडातून विकास करणे, त्यामुळे रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि वीज यांसारख्या सुविधांची उत्तम सोय करण्यात आली आहे.

# आयपीए-कामगार महासंघाची बैठक यशस्वी

## बोनस, भरती, पेन्शनवर मोठे निर्णय

**उरण : रामप्रहर वृत्त**

बंदर कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर नुकतेच दिल्लीत ऐतिहासिक पाऊल पडले. इंडियन पोर्ट असोसिएशन (आयपीए) आणि सहा मान्यताप्राप्त कामगार महासंघांच्या प्रतिनिधींची उच्चस्तरीय बैठक आयपीएचे अध्यक्ष सुशील कुमार सिंग यांच्या अध्यक्षतेखाली अतिशय सकारात्मक वातावरणात पार पडली. बैठकीतील सकारात्मक चर्चेनंतर कामगार संघटनांनी २१ मे रोजी प्रस्तावित असलेली देशव्यापी निदर्शने तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

सर्व बंदरांना बोनस (पीएलआर) संदर्भातील मार्गदर्शक सूचना व स्पष्टीकरण देण्यात आले आहे. ज्या बंदरांना अजूनही शंका असतील, त्यांनी गुरुवार-शुक्रवारपर्यंत आयपीएशी संपर्क साधून तातडीने पूर्तता करावी, असे निर्देश देण्यात आले. मुंबई, चेन्नई, विशाखापट्टणमसह अनेक बंदरांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीतील अडथळ्याची (स्टॅग्नेशन) आयपीएला पूर्ण कल्पना असून यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन अध्यक्ष सिंग यांनी दिले. पेन्शनमध्ये होणाऱ्या कपातीच्या गंभीर विषयाचा सविस्तर अभ्यास करून मंत्रालयाशी चर्चा केली जाईल. गरज भासल्यास पत्रव्यवहार करून मार्ग काढला जाईल. एप्रिल २०२६ पासून नवीन पीएलआर (बोनस) योजना लागू करण्यासाठी समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच १ जानेवारी २०२७ पासूनच्या नवीन वेतन करारासाठी फेडरेशनचे मागणीपत्र मिळताच द्विपक्षीय वेतन समिती स्थापन होईल.



### निदर्शने स्थगित, कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण

बैठकीत सर्वच विषयांवर सकारात्मक चर्चा झाल्याने प्रशासनाने २१ मेची निदर्शने न करण्याची विनंती केली. त्याला प्रतिसाद देत फेडरेशन नेत्यांनी निदर्शने पुढे ढकलली आहेत. या बैठकीला भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाचे जनरल सेक्रेटरी सुरेश पाटील, माजी अध्यक्ष आमदार प्रदीप बिजली, जी.एम. कृष्णमूर्ती, सुधाकर अपराज, नरेंद्र राव, अबुलकर यांच्यासह सर्व महासंघांचे प्रमुख नेते उपस्थित होते. बंदर कर्मचाऱ्यांसाठी ही बैठक मैलाचा दगड ठरणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

तृतीय व चतुर्थ श्रेणीतील रिक्त पदांची माहिती घेऊन मंत्रालयाकडे भरतीसाठी शिफारस केली जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे बंदरातील 'कोअर ॲक्टिव्हिटी'साठी आऊटसोर्सिंग न करता कायमस्वरूपी भरती करण्याचे धोरण ठरले आहे. प्रत्येक बंदरातील अनुकंपा भरतीच्या प्रलंबित अर्जांची माहिती घेऊन धोरण निश्चित केले जाईल. तसेच सेवेत असताना मृत झालेल्या एनपीएस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना नियमाप्रमाणे सर्व लाभ मिळावेत, अशी मागणी करण्यात आली. कामगार प्रश्नांवर सातत्याने संवाद राहावा यासाठी आयपीए आणि फेडरेशन्समध्ये त्रैमासिक बैठक घेण्याचे ठरले. पुढील बैठक जुलै २०२६मध्ये होईल.

# चला! देशापुढे महाराष्ट्राच्या बचतींचा आदर्श ठेवूया!!

ज्या ज्या वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. "हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला" ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. 'जितकी बचत, तितकी राष्ट्रसेवा' हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबजावणी करायची आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे.

आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत.



कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे.

ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे.

शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे.

बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो.

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल.

कारण संकटे येत राहतात पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊ या. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊया. देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करूया.

**-प्रवीण टाके,**
**उपसंचालक, (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# आंबा बागायतदार अडचणीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

काही दिवसांपासून सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे आधीच संकटात सापडलेला कोकणातील आंबा बागायतदार आता पुन्हा एकदा मोठ्या चिंतेत सापडला आहे. हवामान विभागाने कोकण विभागात पावसाचा अंदाज वर्तवला असून, यामुळे बागायतदारांची धडधड वाढली आहे. जर वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला, तर हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.



भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राने कोकण किनारपट्टी आणि मुंबई परिसरातील जिल्ह्यांसाठी अधिकृत हवामान अंदाज जाहीर केला आहे. या अंदाजानुसार कोकणात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि वादळी वाऱ्याचा 'यलो अलर्ट' देण्यात आला असून, रायगड आणि ठाणे जिल्ह्यातही काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात आंबा लागवडीखालील क्षेत्र ४२ हजार हेक्टर आहे. त्यापैकी १४ हजार ५०० हेक्टर क्षेत्र उत्पादनक्षम आहे, मात्र यंदाच्या हंगामात निसर्गाच्या लहरीपणामुळे आंब्याचे उत्पादन आधीच कमालीचे घटले आहे. अनेक भागांत झाडांवर मोजकाच आंबा शिल्लक आहे. त्यातच अजूनही बहुतांश बागायतदारांचा आंबा काढणीचा अंतिम टप्पा बाकी आहे. अशा परिस्थितीत जर वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळला, तर झाडावर राहिलेला आंबा मोठ्या प्रमाणावर गळून पडेल, असा भीतीयुक्त अंदाज वर्तवला जात आहे.

पावसामुळे केवळ आंबा गळतीचेच संकट नाही, तर बाजारातील गणितेही बिघडण्याची शक्यता आहे. पाऊस पडल्यास आंब्याची गुणवत्ता घसरते, डाग पडतात आणि तो सडण्याचा धोका वाढतो. परिणामी बाजारात आंब्याचे दर कमालीचे कोसळू शकतात. आधीच कमी उत्पादनामुळे आर्थिक अडचणीत असलेला बागायतदार, दर घसरल्यास पूर्णपणे कोलमडून जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. सध्या शेतकरी आणि बागायतदार हवामानाचा अंदाज घेऊन जसा जमेल तसा आंबा उतरवून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी लगबग करत आहेत, परंतु निसर्गाच्या या लहरीपणापुढे आता बागायतदार हतबल झाले असून सर्वांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.

विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह होणाऱ्या या पावसामुळे आंबा, काजू तसेच काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी तसेच वादळाच्या वेळी झाडांखाली किंवा खुल्या मैदानात आश्रय घेणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# व्यसनमुक्त खोपोलीसाठी पानटपरी चालकांची साथ; आवाहनाला प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील नागरिक आणि वशेष करून तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकू नये, आरोग्यदायी समाज घडावा आणि अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होऊ नयेत या सामाजिक जाणीवेतून खोपोली पोलीस स्टेशनने शहरातील पानटपरी चालकांची विशेष बैठक घेतली. यावेळी प्रभारी पोलीस अधिकारी सचिन हिरे यांनी गुटखा, ई-सिगारेट, व्हेप, हुक्का, फुलचंद पान तसेच प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री टाळण्याचे आवाहन केले.



बैठकीत त्यांनी युवक आणि विद्यार्थी वर्गामध्ये वाढणाऱ्या व्यसनाधीनतेबद्दल चिंता व्यक्त केली. क्षणिक नफ्यासाठी विकल्या जाणाऱ्या पदार्थांमुळे अनेक कुटुंबांवर आरोग्य आणि आर्थिक संकट ओढवत असल्याचे सांगत, कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे वाढते प्रमाण ही समाजासाठी धोक्याची घंटा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शासनाने बंदी घातलेल्या पदार्थांची विक्री करताना कोणीही आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची स्पष्ट जाणीव करून देतानाच ही कारवाई केवळ दंडात्मक नसून समाजहितासाठीची पूर्वसूचना असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरातील प्रत्येक व्यावसायिकाने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

विशेष म्हणजे, या बैठकीत उपस्थित सर्व पानटपरी धारकांनीही सकारात्मक प्रतिसाद देत प्रतिबंधित पदार्थांची विक्री टाळण्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका मांडली. "व्यवसायासोबत समाजाचे आरोग्यही महत्त्वाचे आहे," ही भावना व्यक्त करत त्यांनी पोलिसांच्या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या जनजागृती मोहिमेमुळे खोपोली शहर व्यसनमुक्त आणि अधिक सुरक्षित करण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल पडत असल्याची भावना व्यक्त होत आहे. व्यसनमुक्तीसाठी ही पोलिसांनी मोहीम हाती घेतली आहे त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# एलएलबी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयात ३ वर्षांच्या एलएलबी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. परीक्षा संपल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत आनंद आणि भावनांचा संगम अनुभवला.



यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त करत कॉलेजला LED संच प्रदान केला तसेच महाविद्यालयाच्या विकासासाठी तब्बल १ लाख रुपयांचा निधी दिला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले. यासोबतच अनेक विद्यार्थ्यांनी पुढे LLM शिक्षण पूर्ण करण्याचा संकल्प व्यक्त केला.

प्राचार्य सोनाली भुर्टे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत, "भविष्यात चांगल्या प्रकारे वकिली करा आणि आपल्या माध्यमातून समाजातील लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करा. पदवी घेतल्यानंतर तिचा योग्य फायदा करा. विशेष म्हणजे महिलांनी योग्य न्याय देण्यासाठी पुढे यावे," असे आवाहन केले.

विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ यांनी आपल्या वकिली क्षेत्रातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांनी सांगितले की, "एलएलबीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे ज्ञान केवळ व्यवसायापुरते मर्यादित न ठेवता समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे. न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास टिकवून ठेवण्याची जबाबदारी वकिलांवर असते."

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत प्राध्यापकांचे आभार मानले. निरोप समारंभामुळे महाविद्यालय परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

# मध्य रेल्वेच्या १० कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक पुरस्कार प्रदान

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी सुरक्षित रेल्वे संचालन सुनिश्चित करण्यासाठी दाखवलेल्या सतर्कतेबद्दल, कर्तव्यनिष्ठेबद्दल आणि वेळेवर केलेल्या कार्यवाहीबद्दल मध्य रेल्वेच्या १० कर्मचाऱ्यांना मे २०२६ महिन्याचे महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्काराने सन्मानित केले आहे.

पुरस्कार विजेत्यांमध्ये मुंबई विभाग (२ पुरस्कार विजेते) यामध्ये श्री महादेव चौधरी, फिटर (सी अँड डब्ल्यू) इगतपुरी, श्री विजय सिंग, वरिष्ठ तंत्रज्ञ (सी अँड डब्ल्यू), छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, पुणे विभाग (३ पुरस्कार विजेते) श्री सुमीत कुमार, उप स्थानक व्यवस्थापक पाटस, श्री बबन जाधव, तंत्रज्ञ (सी अँड डब्ल्यू) कोल्हापूर, श्री मोहम्मद शेख शकील, गेटमन येवला, भुसावळ विभाग (३ पुरस्कार विजेते) श्री हिमांशू अग्रवाल, ट्रेन मॅनेजर इटारसी, श्री बाबू किरण, सहाय्यक लोको पायलट भुसावळ, श्री एस. एस. खेडेकर, हेड कॉन्स्टेबल भुसावळ, सोलापूर विभाग (१ पुरस्कार विजेता) श्री भारत गोरख पासाले, ट्रॅक मेंटेनर मलिकपेठ, नागपूर विभाग (१ पुरस्कार विजेता) श्री राजेश कुमार, ट्रेन मॅनेजर नागपूर यांचा समावेश आहे.







**पेण : शहरातील आर.पी. नगर येथे डांबरीकरण कामाचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या हस्ते झाले तसेच नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत आर.पी. नगरमधील नाल्यांची पाहणी करण्यात आली. यावेळी उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, नगरसेविका वसुधा पाटील आदी उपस्थित होते.**

# विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात आठवणींना उजाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील अशोक साबळे विधी महाविद्यालयात एलएलबी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला. तीन वर्षांच्या सहवासातील गोड आठवणी, संघर्ष, मैत्री आणि शिक्षणाचा प्रवास यांना उजाळा देताना अनेक विद्यार्थी भावुक झाले. महाविद्यालयीन जीवनातील प्रत्येक क्षण डोळ्यांसमोर उभा राहत असल्याने कार्यक्रमात आनंदासोबतच विरहाचीही भावना दाटून आली होती.



परीक्षा संपल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या समारंभात विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना महाविद्यालयाने दिलेल्या ज्ञान, संस्कार, शिस्त आणि मार्गदर्शनाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. "महाविद्यालय हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून आमच्या आयुष्याला दिशा देणारे कुटुंब आहे." प्राचार्य सोनाली बुरटे यांनी कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान न करता करारीपणा आणि कडक शिस्त आम्हाला प्रेरणा देणारी ठरली अशा शब्दांत विद्यार्थ्यांनी आपल्या भावना मांडल्या. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयासाठी एकतेचे आणि प्रेमाचे प्रतीक म्हणून भेटवस्तू देत महाविद्यालयाबद्दलचा जिव्हाळा व्यक्त केला. तसेच महाविद्यालयाच्या विकासासाठी तब्बल एक लाख रुपयांचा निधी आणि मोठा एलसीडी विद्यार्थ्यांकडून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी पुढील उच्च शिक्षण घेऊन समाजासाठी सक्षम वकील म्हणून कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी प्रामाणिकपणे आणि संवेदनशीलतेने काम करण्याची गरज असल्याचेही विद्यार्थ्यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या सोनाली बुरटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "वकिली हा केवळ व्यवसाय नसून समाजाला न्याय देण्याचे पवित्र कार्य आहे. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील दुर्बल आणि गरजू लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी करा. विशेषतः महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्या." त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली. विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ यांनी आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा

**कर्जत :** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा ५४वा वर्धापन दिन येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यानिमित्त क्रिकेट, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ, कॅरम, पुरुष व महिला संगीत खुर्ची, अंताक्षरी व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी, मजूर व कंत्राटी कामगारांनीसुद्धा हिरीरीने सहभाग नोंदवला. बक्षीस वितरण समारंभास व्यासपीठावर प्रमुख कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर उपस्थित होते. यानिमित्ताने मागील वर्षी उत्कृष्ट काम करणाऱ्या कनिष्ठ भात पैदासकार डॉ. एम. पी. गवाई, कनिष्ठ कृषिविद्यावेत्ता डॉ. एन. व्ही. म्हसकर, कृषी पर्यवेक्षक माहेशकुमार घारपुरे,वरिष्ठ संशोधन छात्र अनिरुद्ध मदने, कार्यालय अधीक्षक एन. एल. निरडे यांना तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवलेल्या स्पर्धकांना गौरविण्यात आले.

# वळवाच्या चाहुलीने सुगरण पक्ष्यांची घरट्यांसाठी लगबग

**माणगाव : प्रतिनिधी**

वळवाच्या पावसाची चाहूल लागताच ग्रामीण भागातील निसर्ग पुन्हा एकदा जिवंत झाला असून सुगरण पक्ष्यांनी आपल्या घरट्यांच्या बांधणीसाठी लगबग सुरू केली आहे. ओढे, नाले, विहिरी तसेच तळ्याकाठच्या झाडांवर पाण्याच्या दिशेने लोंबकळणारी सुगरण पक्ष्यांची कलात्मक घरटी सध्या नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी ही घरटी म्हणजे पावसाच्या आगमनाची जणू नैसर्गिक सूचना ठरत आहेत.



दरवर्षीप्रमाणे यंदाही जून महिन्याच्या प्रारंभीच सुगरण पक्ष्यांनी घरटी बांधण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे नर सुगरण पक्षी अत्यंत मेहनतीने गवताच्या काड्या, पेंढा, धागे आणि बारीक तंतू गोळा करून हवेत लटकणारी सुंदर घरटी तयार करतात. घरट्यांची रचना इतकी मजबूत आणि आकर्षक असते की ती पाहून प्रत्येकजण अचंबित होतो. या घरट्यांमध्ये सुरक्षित प्रवेशद्वार, अंडी ठेवण्याची जागा आणि पिल्लांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र भाग तयार करण्यात येतो. सुगरण पक्ष्यांची ही घरटी प्रामुख्याने काटेरी झाडांवर किंवा पाण्याच्या परिसरातील झाडांच्या फांद्यांवर बांधली जातात. यामागे पिल्लांचे संरक्षण हा मुख्य उद्देश असतो. पावसाळ्यात वाऱ्याचा वेग, पावसाचा मारा आणि इतर पक्ष्यांपासून धोका टाळण्यासाठी सुगरण पक्षी अतिशय नियोजनपूर्वक जागेची निवड करतात. त्यामुळे त्यांच्या या कौशल्यपूर्ण बांधकामाचे ग्रामस्थांकडून नेहमीच कौतुक केले जाते. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी सांगतात की, सुगरण पक्ष्यांची हालचाल वाढू लागली की पावसाचे आगमन जवळ आले आहे, अशी खात्री वाटू लागते. त्यामुळे शेतीच्या कामांनाही वेग येतो.

निसर्ग आणि पक्ष्यांमधील हे अनोखे नाते ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग मानले जाते. सुगरण पक्ष्यांच्या घरट्यांची रचना ही वास्तुकलेचा अप्रतिम नमुना मानली जाते. साधारण दीड ते दोन फूट लांबीची ही घरटी खाली निमुळती होत जातात. प्रवेशद्वार अरुंद आणि सुरक्षित असल्यामुळे पिल्लांना धोका कमी असतो. गवताच्या विणकामातून तयार होणारी ही घरटी निसर्गातील कौशल्य, संयम आणि मेहनतीचे प्रतीक मानली जातात. पक्षी निरीक्षकांच्या मते, बदलत्या पर्यावरणामुळे अनेक पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले असले तरी सुगरण पक्ष्यांची ही घरटी आजही निसर्ग संवर्धनाचा महत्त्वाचा संदेश देतात.

झाडांची होणारी तोड, पाणवठ्यांचे कमी होणारे प्रमाण आणि वाढते प्रदूषण यामुळे पक्ष्यांचे अधिवास धोक्यात येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी पक्षी संवर्धनाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या आगमनापूर्वी सुगरण पक्ष्यांची सुरू झालेली ही लगबग ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आकर्षण ठरत असून निसर्गप्रेमींना आनंद देणारी ठरत आहे.

निसर्गातील या सुंदर कलाकृती पाहण्यासाठी अनेकजण ओढे, तलाव आणि शेत परिसरात गर्दी करताना दिसत आहेत.

# द्विसाप्ताहिक एक्स्प्रेस ट्रेन सुरू होणार; कर्जत स्थानकात थांबा

**रोहा : प्रतिनिधी**

रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी आणि कर्नाटक व महाराष्ट्र यांच्यातील संपर्क वाढवण्यासाठी सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनल बंगळुरू (एसएमव्हीबी) आणि लोकमान्य टिळक टर्मिनस दरम्यान नियमित द्विसाप्ताहिक एक्सप्रेस सेवा सुरू करणार आहे.

या गाडीला रायगड जिल्ह्यातील कर्जत रेल्वे स्थानकात थांबा देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रवाशांना त्याचा फायदा होणार आहे. गाडी क्रमांक १६५५३/१६५५४ एसएमव्हीबी बेंगळुरू लोकमान्य टिळक टर्मिनस द्विसाप्ताहिक एक्सप्रेस गाडी क्रमांक १६५५४ लोकमान्य टिळक टर्मिनस एसएमव्हीबी बेंगळुरू द्विसाप्ताहिक एक्सप्रेस ही सेवा दिनांक २४.०५.२०२६ पासून लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर रविवार आणि बुधवारी सुरू होईल.गाडी क्रमांक १६५५४ लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर रविवार आणि बुधवारी २३.१५ वाजता सुटेल आणि एसएमव्हीबी बेंगळुरू येथे दुसऱ्या दिवशी २२.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक १६५५३ एसएमव्हीबी बेंगळुरू लोकमान्य टिळक टर्मिनस द्विसाप्ताहिक एक्सप्रेस दिनांक २३.०५.२०२६ पासून एसएमव्हीबी बेंगळुरू येथून दर शनिवार आणि मंगळवारी धावेल.गाडी क्रमांक १६५५३ एसएमव्हीबी बेंगळुरू येथून शनिवार आणि मंगळवारी २०.३५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी २०.४० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या गाडीला ठाणे, कल्याण, कर्जत, लोणावळा, पुणे, लोणंद, सातारा, कराड, सांगली, मिरज जंक्शन, बेळगावी, धारवाड, एस.एस.एस. हुबळी जंक्शन, करजगी, दावणगेरे आणि सम्पिगे रोड हे थांबे देण्यात आले आहेत.

# निर्लेखित साहित्याच्या विक्रीकरिता जीएसटीधारक भंगार खरेदीदारांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र पनवेल, जि.रायगड या संस्थेमधील निर्लेखित झालेले निरुपयोगी व भंगार साहित्याची दरपत्रके मागवून विक्री करावयाची आहे.. याकरिता इच्छुक जी.एस.टी.धारक भंगार खरेदीदारांनी विहित नमुन्यातील नमुना अर्ज डिडी.सह दि.२५ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल येथे जमा करावे, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र पनवेल वि.द.टिकोले यांनी केले आहे.

हे भंगार साहित्य संबंधित विभागामध्ये ठेवण्यात आलेले असून सदरचे सर्व साहित्य आहे त्या स्थितीत निविदा पध्दतीने विक्री करणे प्रस्तावित आहे. यामध्ये निरनिराळ्या व्यवसायामधील जुन्या व निकामी झालेल्या यंत्रसामुग्री हत्यारे, उपकरणे, फर्निचर, संगणक, संगणक सामुग्री, आय.टी. उपकरणे तसेच भंगार व निरुपयोगी साहित्याचे एम.एस. स्क्रॅप, ट्युबपट्टी स्क्रॅप, प्लॅस्टिक स्क्रॅप, रिकामे टोनर, टायर स्क्रॅप, पेपर रद्दी इत्यादी विविध प्रकारच्या बाबी समाविष्ट आहेत.

या निविदा प्रक्रियेकरीता लिफाफापध्दतीने निविदा सादर करावयाची आहे. त्यासाठी फक्त जी.एस.टी. नोंदणी धारक भंगार खरेदीदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत असून ज्या खरेदीदाराचे दर कमाल असतील अशा पात्र जी.एस.टी. नोंदणी धारक खरेदीकारास भंगार साहित्याची विक्री करण्यात येईल.

# राजस्थानचा लखनऊवर 'रॉयल' विजय

**जयपूर : वृत्तसंस्था**

जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सच्या संघाने लखनऊ सुपर जाएंट्सविरुद्ध रॉयल विजय नोंदवला. २२१ धावांचा यशस्वी पाठलाग करताना वैभव सूर्यवंशी याने ३८ चेंडूत ९३ धावांची खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. याशिवाय ध्रुव जुरेल याने ३८ चेंडूत ५३ धावांची नाबाद खेळी केली. यशस्वी जैस्वालच्या नेतृत्वाखालील पहिल्या विजयासह राजस्थान रॉयल्सच्या संघाने प्लेऑफ्सच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे.



यशस्वी जैस्वाल याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना लखनऊ सुपर जाएंट्सच्या संघाने दमदार सुरुवात केली. मिचेल मार्श ९६ (५७) आणि जॉश इंग्लिस ६० (२९) या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचली. निकोलस पूरन ११ चेंडूत १६ धावा करून बाद झाला. कर्णधार ऋषभ पंतने २३ चेंडूत दिलेल्या ३५ धावांच्या योगदानाच्या जोरावर लखनऊच्या संघाने निर्धारित २० षटकात पाच विकेट्सच्या मोबदल्यात २२० धावा करत राजस्थान रॉयल्ससमोर २२१ धावांचे टार्गेट सेट केले होते. राजस्थानकडून यश राज पुंजा याने सर्वाधिक दोन, तर जोफ्रा आर्चरने एक विकेट घेतली.

### वैभव सूर्यवंशीची धमाकेदार खेळी; 'ध्रुव-तारा'ही चमकला

या धावसंख्येचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी पहिल्या विकेटसाठी ७५ धावांची खेळी करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. एका बाजूला वैभव सूर्यवंशी संयमी खेळी करत असताना दुसऱ्या बाजूने कार्यवाहू कर्णधार यशस्वी जैस्वालने आक्रमक पवित्रा घेतला. त्याने २३ चेंडूत ४३ धावा केल्या. तो परतल्यावर वैभव सूर्यवंशीने गियर बदलला. ३८ चेंडूत सात चौकार आणि १० षटकारांच्या मदतीने ९३ धावांची धमाकेदार खेळी करत सामना राजस्थानच्या बाजूने सेट केला. दुसऱ्या बाजूला ध्रुव जुरेल याने नाबाद अर्धशतक झळकावले. त्याने डोनोव्हन फरेरा १६ (१०) साथीने राजस्थानच्या संघाचा विजय निश्चित केला. लखनऊकडून गोलंदाजीत आकाश महाराज सिंग आणि मोहसिन खान यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## एशियन पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी किर्णाक्षी येवलेची निवड

**पाली : प्रतिनिधी**

दहाव्या पिंच्याक सिलॅट एशियन चॅम्पियनशिपसाठी किर्णाक्षी किशोर येवले हिची भारतीय संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा १५ ते २३ जुलैदरम्यान व्हिएतनाम येथे आयोजित करण्यात आली असून या प्रतिष्ठित स्पर्धेत १७ देशांतील सुमारे ४०० खेळाडू सहभागी होणार आहेत.

भारतीय संघाची निवड चाचणी नुकतीच श्रीनगर येथील शेर-ए-कश्मीर इंडोर स्टेडियममध्ये पार पडली. या चाचणीत देशातील विविध राज्यांमधून तसेच पॅरामिलिटरी फोर्समधील सुमारे ३५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यातून किर्णाक्षी हिची तुंगल प्रकारात निवड झाली असून ती या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.




किर्णाक्षी हिने आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी करत ज्युनियर सिंगापूर ओपनमध्ये सुवर्णपदक जिंकले आहे तसेच नॅशनल गेम्स, खेलो इंडिया बीच गेम्स, भारतीय विद्यापीठ पुणेच्या संघातून खेळून ऑल इंडिया इंटर-युनिव्हर्सिटी चॅम्पियनशिप आणि इतर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये तिने एकूण ११ सुवर्ण, ११ रौप्य, सहा कांस्य अशी एकूण २९ पदके मिळवली आहेत.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण यश मिळवत असल्यामुळे एशियन पिंच्याक सिलॅट चॅम्पियनशिपमध्ये तिच्याकडून भारतासाठी पदकाची मोठी अपेक्षा आहे. तिला महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशन व क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## 'आरडीसीए'च्या स्पर्धेत फ्युचर स्टार क्लिनिक संघ चॅम्पियन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत फ्युचर स्टार क्रिकेट क्लिनिक संघाने धमाकेदार खेळाचे प्रदर्शन करत अंतिम विजयी होण्याचा मान मिळवला आहे.

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात फ्युचर स्टार संघाने करण क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाचा पराभव करत स्पर्धेची चॅम्पियनशिप पटकावली आहे. प्रथम फलंदाजी करताना पनवेल संघाने निर्धारित ४० षटकांमध्ये १० गडी गमावत ११५ धावा फलकावर नोंदवल्या. त्यामध्ये पीयूष दांडेकर याने सर्वाधिक ३१ धावा काढल्या. फ्युचर स्टार संघाकडून कियांश याने दोन, तर ओजस उपाध्ये, पुनीत मिश्रा, जीवांश शर्मा, आराध्य कळंबे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

११६ धावांचे लक्ष्य घेऊन फलंदाजीला आलेल्या फ्युचर स्टार संघाने अवघ्या २९व्या षटकात चार गडी गमावत ११९ धावा काढून विजय प्राप्त केला. यामध्ये आराध्य कळंबे याने सर्वाधिक ३९, त्याखालोखाल आरव दीक्षित ३४ व साद अहमदने १८ धावांचे योगदान दिले. पनवेल संघाकडून आदर्श जैसवार याने दोन, तर पीयूष दांडेकर व ओम गडगे यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज म्हणून आयुष भारती, उत्कृष्ट गोलंदाज आदर्श जैसवार, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अथर्व जाधव, तर मालिकावीर म्हणून रोनीत चौहान यांना आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सदस्य प्रदीप खलाटे, अरुण शिंदे, प्रशिक्षक करण कांबळे, आदिल खान, पंच एजाज मारूफ, रमेश ढकोळ, अमर गुप्ता यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## डायरेक्ट व्हॉलिबॉल जिल्हा चाचणी स्पर्धा उत्साहात; पेण संघ विजेता



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील फकिरपाडा-नांदाईपाडा येथे रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशन आणि जय हनुमान क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डायरेक्ट व्हॉलिबॉल जिल्हा चाचणी स्पर्धा २०२६-२७ मोठ्या उत्साहात पार पडली. पुरुष व महिला गटासाठीच्या या स्पर्धेला जिल्हाभरातून खेळाडू व क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेचे उद्घाटन अलिबाग पंचायत समितीच्या उपसभापती प्रिया भगत, उद्योजक जितेंद्र म्हात्रे, शिवसेना उपविभाग प्रमुख प्रशांत मयेकर, नरेश वालेकर, अनंत नरे, आकांक्षा राणे यांच्या उपस्थितीत पार पडला. स्पर्धेला आमदार महेंद्र दळवी, जि.प.सदस्य दिलीप भोईर यांनी शुभेच्छा संदेश दिला.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत पेण संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम विजेतेपद पटकावले, बोरपाडा संघ उपविजेता ठरला, तर अलिबाग संघाने तृतीय क्रमांक मिळविला. यजमान फकिरपाडा संघाला चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेचे बक्षीस वितरण डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशन महाराष्ट्र व डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशनचे रायगडचे जनरल सेक्रेटरी दीपक मोकल, यतिराज पाटील, आशिष पाटील, प्रसन्ना पाटील, गणेश भोईर यांच्या हस्ते झाला. विजेत्या संघांना रोख रक्कम व भव्य चषक देऊन गौरविण्यात आले.

## वैभव सूर्यवंशीचा नवा विश्वविक्रम


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॉस बेबी म्हणून ओळख मिळवणाऱ्या अवघ्या १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६मध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळताना सुपरजायंट्सविरुद्धच्या सामन्यात एका आयपीएल हंगामात ५०० धावा पूर्ण करून नवा इतिहास लिहिला. यासह तो कोणत्याही टी-२० स्पर्धेत ५०० धावा करणारा जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे.

या ऐतिहासिक कामगिरीसह त्याने ऋषभ पंतचा विक्रमही मोडला. यापूर्वी आयपीएलच्या एका हंगामात ५०० धावा करणारा सर्वात तरुण खेळाडू म्हणून पंतच्या नावावर विक्रम होता, जो त्याने २०१८मध्ये केला होता. एवढेच नाही तर वैभव सूर्यवंशी एकाच आयपीएल हंगामात ५० व त्याहून अधिक षटकार मारणारा पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. आता वैभवला ख्रिस गेलचा विक्रम मोडण्याची मोठी संधी आहे. एकाच आयपीएल हंगामात सर्वाधिक ५९ षटकार मारण्याचा विक्रम गेलच्या नावावर आहे.

## आयपीएलमध्ये चमकले, आता भारतीय संघात निवड

### चार खेळाडूंनी वेधले लक्ष



**मुंबई : प्रतिनिधी**

बीसीसीआयने अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली. टीम इंडिया जून महिन्यात एक कसोटी आणि तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. संघात चार नवीन खेळाडूंचाही समावेश करण्यात आला आहे.

गुरनूर ब्रारची भारतीय कसोटी आणि वनडे संघात निवड झाली आहे. आयपीएल २०२३मध्ये पंजाब किंग्सने राज बावाच्या जागी त्याला संघात घेतले होते. यानंतर आयपीएल २०२५च्या लिलावात गुजरात टायटन्सने त्याच्यावर १.३० कोटी रुपयांची मोठी बोली लावत संघात समाविष्ट केले.

महाराष्ट्राच्या मातीतून आलेला फिरकीपटू हर्ष दुबे यालाही अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी आणि एकदिवसीय दोन्ही संघांत स्थान मिळाले. आयपीएल २०२५मध्ये सनरायझर्स हैदराबादने त्याला रिप्लेसमेंट खेळाडू म्हणून संघात घेतले. राजस्थानमधून आलेला डाव्या हाताचा फिरकीपटू आणि खालच्या फळीतील उपयुक्त फलंदाज मानव सुथारला अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी संघात संधी देण्यात आली. तो आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून खेळतो.

२४ वर्षीय वेगवान गोलंदाज प्रिन्स यादव यानेही अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय संघात जागा मिळवली आहे. सध्या तो लखनऊ सुपर जाएंट्स संघाकडून खेळत आहे.

## बांगलादेशचा पाकिस्तानवर ऐतिहासिक विजय

### कसोटी मालिकेत २-०ने मात; तैजुल इस्लामच्या सहा विकेट्स

**सिल्हेट : वृत्तसंस्था**

पाकिस्तानला बांगलादेशविरूद्ध लाजिरवाण्या मालिका पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दोन सामन्यांच्या कसोटीत मालिकेत बांगलादेशने २-०ने मालिकेत निर्भेळ विजय मिळवला आहे. दुसऱ्या कसोटीत पाकिस्तानकडून दुसऱ्या डावात मोहम्मद रिझवानने कडवी झुंज दिली, पण बांगलादेशच्या गोलंदाजीपुढे पाकिस्तानने गुडघे टेकले आणि हा सामना ७८ धावांनी गमावला.

या सामन्याची नाणेफेक पाकिस्तानने जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि बांगलादेशला फलंदाजीसाठी पाचारण केले. बांगलादेशने पहिल्या डावात २७८ धावा केल्या, तर पाकिस्तानचा संघ प्रत्युत्तरात २३२ धावांवर सर्वबाद झाला. यानंतर बांगलादेशने ४६ धावांची आघाडी घेतली आणि तिसऱ्या डावात ३९० धावा केल्या. म्हणजेच पाकिस्तानला विजयासाठी एकूण ४३६ धावांचे आव्हान दिले, जे पाकिस्तान पूर्ण करण्यात अपयशी ठरला. दुसऱ्या डावात तैजुल इस्लामने सहा विकेट्स घेत पाकिस्तान संघावर चांगलाच भारी पडला.



दुसऱ्या कसोटीच्या अंतिम दिवशी पाकिस्तानला विजयासाठी १२१ धावांची गरज होती आणि संघाकडे तीन विकेट्स शिल्लक होत्या. दिवसाच्या पहिल्या सत्रात रिझवान आणि साजिद खान यांनी आठव्या विकेटसाठी ५० धावांची भक्कम भागीदारी रचली. पाकिस्तानचा संघ मजबूत स्थितीत सरकत होता, पण बांगलादेशचा गोलंदाज तैजुल इस्लामने साजिद खानला बाद करून ही भागीदारी तोडली.

पुढच्याच षटकात आपले चौथे कसोटी शतक आणि घरच्या मैदानाबाहेरील पहिले शतक करण्याच्या उंबरठ्यावर असलेला मोहम्मद रिझवान शरीफुल इस्लामच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर तैजुल इस्लामने पाकिस्तानच्या खुर्रम शहजादला बाद करत बांगलादेशच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

बांगलादेशने दिलेल्या ४३७ धावांना प्रत्युत्तर देताना पाकिस्तानचा संघ दुसऱ्या डावात ३५८ धावांवर गारद झाला आणि त्यांनी ७८ धावांनी सामना गमावला. पाकिस्तानकडून मोहम्मद रिझवानने १६६ चेंडूंमध्ये ९४ सर्वाधिक धावा केल्या, तर कर्णधार शान मसूद आणि सलमान आघा यांनी प्रत्येकी ७१ धावा केल्या, मात्र या खेळींमुळे संघाला विजय मिळवता आला नाही. तैजुल इस्लामने बांगलादेशसाठी ३४.२ षटकांत १२० धावा देऊन सहा बळी घेतले.

## चेपॉकवरील 'त्या' वादावर संजू-क्लासेनकडून पडदा

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेत चेपॉकच्या मैदानावर चेन्नई सुपर किंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये हाय व्होल्टेज सामना पहायला मिळाला. हा चेन्नईचा या हंगामातील घरच्या मैदानावरील शेवटचा सामना होता. त्यामुळे दोन्ही संघांनी पूर्ण जोर लावला. पण घरच्या मैदानावर खेळताना चेन्नईला विजयाने शेवट करता आला नाही. हा सामना हैदराबादने खिशात घातला आणि प्लेऑफमध्ये प्रवेश केला.

यादरम्यान नेहमीच शांत राहणाऱ्या संजू सॅमसन आणि हेनरिक क्लासेन यांच्यादरम्यान जोरदार वाद झाला. हे पाहून अनेकांना धक्का बसला. या वादानंतर आता दोघांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली आहे, जी सध्या तुफान चर्चेत आहे.

संजू सॅमसन आणि हेनरिक क्लासेन यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून स्टोरी शेअर केली आहे, ज्यात दोघे मिठी मारताना दिसून येत आहेत. दोघांनी मैदानावर जे झालं ते विसरून, मैदानाबाहेरील आपली मैत्री जपली आहे. हा फोटो शेअर करून संजू सॅमसनने आपलया कॅप्शनमध्ये लिहिले की, "मैदानावर अनेक गोष्टी घडतात, पण मैदानाबाहेर या व्यक्तीबद्दल माझ्या मनात आदर आहे प्रेम आहे." हेनरिक क्लासेननेही ही स्टोरी शेअर करत लिहिले की, "तुझ्याबद्दल माझ्याही मनात प्रेम आणि आदर आहे. तुला खेळताना पाहायला आवडतं. आमच्यात सर्वकाही ठीक आहे. आता मी पुढच्या लढतीची वाट पाहत आहे."

हा वाद चेन्नईची गोलंदाजी सुरू असताना १५ व्या षटकात घडला. त्यावेळी हैदराबादचा संघ १८१ धावांचा पाठलाग करत होता. त्यावेळी हेनरिक क्लासेन ४७ धावांवर फलंदाजी करत होता. गोलंदाजी करत असलेल्या नूर अहमदच्या गोलंदाजीवर तो यष्टीचीत होऊन माघारी परतला. बाद होताच तो संताप व्यक्त करू लागला. यादरम्यान तो संजू सॅमसनकडे गेला आणि त्याला काहीतरी बोलू लागला. शेवटी अंपायर्स मध्ये आले आणि वाद वाढायच्या आधीच थांबवला.

## मिचेल मार्श पुन्हा ठरला कमनशिबी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जाएंट्सचा सलामीवीर मिचेल मार्श याने जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर आणखी एक धमाकेदार खेळी केली, पण सलग दुसऱ्या सामन्यात तो नव्वदीच्या घरात फसला अन् शतकाला मुकला.

यंदाच्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध मार्शच्या बॅटमधून शतक पहायला मिळाले होते. राजस्थान विरुद्धच्या ९६ धावांच्या खेळीसह १३ सामन्यात ५६३ धावा करत ऑरेंज कॅपच्या शर्यतीत त्याने हेन्रिक क्लासेनला मागे टाकले. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात ३८ चेंडूत ९० धावांची खेळी करणाऱ्या मार्शने राजस्थान रॉयल्सविरुद्ध ५७ चेंडूत ९६ धावांची दमदार खेळी केली. डावातील अखेरच्या षटकात दुसरी धाव घेताना तो धावबाद झाला. यशस्वी जैस्वालने डायरेक्ट थ्रोसह त्याच्या खेळीला ब्रेक लावला. चेन्नईविरुद्धच्या सामन्यातही तो धावबादच झाला होता.

## ...म्हणून कसोटी क्रिकेटचे कर्णधारपद सोडले!

### विराट कोहलीने प्रदीर्घ काळानंतर सोडले मौन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा वनडेतील स्टार फलंदाज विराट कोहलीने जानेवारी २०२२मध्ये कसोटी कर्णधारपदाचा राजीनामा दिलाहोता. त्याने ६८ कसोटी सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व करताना ४० विजय मिळवून दिले होते. कसोटीमधील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक अशी त्याची ओळख झाली. कसोटी कर्णधारपद सोडण्याच्या काही महिने आधी कोहलीने टी-२० संघाचे नेतृत्वही सोडले होते आणि त्यानंतर त्याला वनडे कर्णधारपदावरूनही हटवण्यात आले होते. नुकतेच विराटने कसोटी संघाचे कर्णधारपद कोणत्या कारणामुळे सोडले याचा खुलासा केला आहे.

आरसीबी इनोव्हेशन लॅबच्या इंडियन स्पोर्ट्स समिटमध्ये बोलताना विराट कोहली म्हणाला, कर्णधारपदाने आपल्याला नकळत आतून पूर्णपणे थकवून टाकले होते. मी अशा एका टप्प्यावर पोहचलो होतो जिथे मी आमच्या



फलंदाजीचा आणि नेतृत्वाचा मुख्य केंद्रबिंदू बनलो होतो. भारतीय क्रिकेट नेहमी अव्वल स्थानी राहावे यासाठी मी इतका प्रेरित आणि उत्सुक होतो की, या दोन्ही गोष्टींचा माझ्या दैनंदिन जीवनावर किती ताण पडत आहे हे माझ्या लक्षातच आले नाही. मी जेव्हा कर्णधारपद सोडले, तेव्हा मी पूर्णपणे खचलो होतो. मी त्यात पूर्णपणे गुरफटून गेलो होतो. तो काळ अत्यंत कठीण होता. लोकांच्या अपेक्षा सांभाळणे खूप अवघड जात होते, असेही त्याने स्पष्ट केले.

"माझ्या सुवर्णकाळात संघ सुरक्षित राहील आणि ड्रेसिंग रूममध्ये कोणत्याही प्रकारची असुरक्षितता निर्माण होणार नाही याची काळजी घेणे हे मुख्य उद्दिष्ट होते. यासाठी मला तत्कालीन मॅनेजमेंट रवी शास्त्री आणि त्यांच्या टीमला याचे मोठे श्रेय द्यावे लागेल, असेही कोहलीने नमूद केले.

भारताचे कर्णधारपद सोडल्यानंतर आपण अत्यंत त्रासदायक आणि कठीण टप्प्यातून गेलो. पण तुमचा फॉर्म नेहमी सारखा राहत नाही आणि जेव्हा फॉर्म खराब होतो, तेव्हा या दोन्ही जबाबदाऱ्या तुमच्यावर दडपण आणू लागतात. त्यामुळे तो काळ खरोखरच कठीण होता, अशी कबुलीही कोहलीने दिली तसेच क्रिकेट खेळण्याचा खरा आनंद पुन्हा शोधून दिल्याबद्दल त्याने राहुल द्रविड आणि विक्रम राठोड यांचे आभार मानले.



सौजन्य : **दशरथ बाळू म्हात्रे** (नगरसेवक, अध्यक्ष, नवीन पनवेल शहर मंडळ भाजपा)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com